दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
वैभव विवेक स्वामी
सपादक
SAMARTH RAJYOG
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –३५० शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-6th Issue-350 Friday, Dt.28 August 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# पुरावे असणाऱ्यांनी ८ दिवसांत अर्ज करावेत

## तात्काळ दाखले देऊ, विखे पाटलांचे आवाहन
## मनोज जरांगेंना केली उपोषण मागे घेण्याची विनंती

छत्रपती संभाजीनगर– मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील हे येत्या २९ ऑगस्टपासून पुन्हा एकदा बेमुदत उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या या उपोषणाच्या इशाऱ्यामुळे राज्य सरकारच्या हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाड्याचे विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत एक तातडीची आढावा बैठक घेतली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी मराठा–कुणबी प्रमाणपत्र वाटप आणि सरकारच्या भूमिकेबाबत सविस्तर माहिती दिली.

**'आठ दिवसांत अर्ज करा, तात्काळ कारवाई होईल'**

कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्र वाटपाबाबत माहिती देताना विखे पाटील म्हणाले की, आतापर्यंत सापडलेल्या नोंदींचा विचार केला, तर केवळ ०.३ टक्केच नोंदी नाकारण्यात आल्या आहेत. बहुतांश लोकांच्या नोंदी ग्राह्य धरून त्यांना प्रमाणपत्रे दिली जात आहेत. ज्या नागरिकांकडे कुणबी असल्याच्या नोंदी आणि पुरावे आहेत, मात्र तरीही त्यांना प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत, अशांनी तात्काळ पुढील आठ दिवसांमध्ये संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत. या अर्जांवर तात्काळ कारवाई करून त्यांना प्रमाणपत्रे दिली जातील.

**५८ लाख नोंदींबाबत सरकारची स्पष्ट भूमिका**



मराठवाड्यात आणि राज्यात सापडलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींच्या मुद्द्यावरही त्यांनी भाष्य केले. या ५८ लाख नोंदींमधून जे नागरिक प्रमाणपत्रासाठी अर्ज करतील, त्या सर्वांना दाखले (प्रमाणपत्रे) देण्यास सरकार पूर्णपणे तयार आहे, अशी ग्वाही विखे पाटील यांनी यावेळी दिली.


**'जरांगे पाटलांनी उपोषण करू नये, हीच विनंती'**

मनोज जरांगे पाटील यांच्या आगामी उपोषणाबाबत बोलताना विखे पाटील म्हणाले की, शासनाच्या बाजूने आम्ही जरांगे पाटील यांची भेट घेऊन त्यांना विनंती केली आहे. ज्या ज्या गोष्टींची पूर्तता करणे आवश्यक होते, ते शासनाने केले आहे. त्यांनी केलेल्या बहुतांश मागण्या सरकारने पूर्ण केल्या आहेत, किंबहुना दोन गोष्टी जास्तच दिल्या आहेत. त्यामुळे त्यांनी २९ ऑगस्ट रोजी होणारे उपोषण करू नये, हाच सरकारचा आग्रह आणि त्यांना नम्र विनंती आहे.

उद्या रक्षाबंधन असल्याने प्रशासकीय बैठक होणार नाही, मात्र प्रशासकीय पातळीवर प्रमाणपत्र वाटपाच्या कामाला गती देण्याचे स्पष्ट निर्देश या बैठकीतून देण्यात आले आहेत.

# पाटोदा तालुक्यावर दुष्काळाचे भीषण सावट

## बळीराजाचे डोळे नभाकडे, करपलेली पिके अन् चाऱ्याच्या चिंतेने शेतकरी हवालदिल



पाटोदा (आजीज शेख )

जवळपास तीन महिन्यांचा कालावधी उलटून गेला तरीही पाटोदा तालुक्यात पावसाने प्रदीर्घ विश्रांती घेतल्याने संपूर्ण तालुका दुष्काळाच्या तीव्र छायेत सापडला आहे. सुरुवातीच्या तुरळक पावसानंतर पावसाने मारलेल्या दडीमुळे खरीप पिके डोळ्यादेखत करपून गेली असून, बळीराजाचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. पिकांचे नुकसान, तीव्र पाणीटंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न अशा तिहेरी संकटात सापडलेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांचे डोळे आता केवळ शासनाच्या तातडीच्या मदतीकडे लागले आहेत.

**दुबार पेरणीचा खर्चही पाण्यात**

सुरुवातीच्या पावसावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरण्या केल्या. मात्र, त्यानंतर पावसाने पाठ फिरवल्याने अनेक भागात पिके जळून गेली. काही शेतकऱ्यांनी कर्ज काढून, उसने-पासने करून पुन्हा बियाणे, खते आणि मशागतीचा खर्च करत दुबार पेरणी केली; परंतु पावसाअभावी दुबार पेरणीही वाया गेली. दोनदा खर्च करूनही हाती काहीच लागणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने शेतकऱ्यांपुढे जगावे कसे, असा यक्षप्रश्न निर्माण झाला आहे.

**शिवारात हिरवाईऐवजी पिवळे पडलेले रान**

एरवी ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये हिरवेगार दिसणारे पाटोदा तालुक्यातील शेतशिवार यंदा ओसाड पडले आहे. शेतातील उभी पिके पिवळी पडून सुकली आहेत. बहुतांश ठिकाणी पिकांची वाढ खुंटली असून, पाने करपून गेली आहेत. मशागत आणि खतांवर केलेला खर्च तर सोडाच, उत्पादन मिळण्याची शक्यताही आता मावळली आहे.

**जलस्रोत आटले; ऐन पावसाळ्यात टँकरची गरज**

पान २ वर...

# शिशुगृहातील दोन बालकांच्या कायदेशीर नातेवाईकांचा शोध सुरू

**३० दिवसांनंतर दत्तक प्रक्रियेबाबत होणार निर्णय**

बीड ।प्रतिनिधी

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत दत्तक प्रक्रियेच्या अनुषंगाने एक महत्त्वाची नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. शिशुगृहात दाखल असलेल्या बालिका आयारा आणि बालक भार्गव या दोन बालकांच्या पालकांचा अथवा कायदेशीर नातेवाईकांचा शोध घेतला जात असून त्यांच्यासाठी ही जाहीर प्रसिद्धी देण्यात आली आहे.

जिल्हा महिला व बाल विकास



अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, बालिका आयारा ही बालिका १७ एप्रिल २०२५ रोजी शिशुगृहात दाखल झाली आहे. तर बालक भार्गव हा बालक २३ डिसेंबर २०२४ रोजी शिशुगृहात दाखल झाला आहे. या

पान २ वर...

# दैनिक समर्थ राजयोगचे राज्यस्तरीय आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार जाहीर..!

## दिव्यांगांच्या विशेष शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचारी सर्वश्री महादेव गोडसे, हनुमान बहिरवाळ,राजेश कालिके, सुग्रीव नांदे, दीपक तांबवे, श्रीमती वर्षा वाघ, आप्पासाहेब मस्के आणि अनिल शिंदे ठरले पुरस्काराचे मानकरी..!!



बीड ।प्रतिनिधी

दैनिक समर्थ राजयोगच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी दिव्यांगांच्या विशेष शाळेतील आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सन्मानित करण्यात येणार आहे. हा सन्मान त्यांच्या हातून होत असलेल्या दिव्यांगांच्या सेवेची दखल घेऊन बाबा आमटे राज्यस्तरीय आदर्श शिक्षकेत्तर कर्मचारी सेवा गौरव पुरस्कार २०२६ देवून सन्मानित करण्यात येणार आहे.

दैनिक समर्थ राजयोग आपल्या वर्धापन दिनानिमित्त मागील सहा वर्षापासून शिक्षक दिनाचे औचित्य साधत दिनांक ५ सप्टेंबर रोजी शिक्षण क्षेत्रातील दुर्लक्षित, वंचित असलेल्या घटकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षकेत्तर पुरस्कार देऊन सन्मानित करत आहे.

यावर्षी बीड जिल्ह्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचारी यांना बाबा आमटे राज्यस्तरीय आदर्श शिक्षकेत्तर सेवा गौरव पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत सर्वश्री, रुक्माई गोविंद मतिमंद निवासी विद्यालय पांगरी रोड, बीडचे कर्मचारी महादेव केरप्पा गोडसे, प्रज्ञाचक्षु निवासी अंध विद्यालय

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
७ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२६

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती

स.न.वि.वि.
मागील ६ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ७ वा वर्धापन दिन शनिवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२६' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

| वर्धापन दिन जाहिरात दरपत्रक | | | | दिनदर्शिका-२०२७ जाहिरात दरपत्रक | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र | विवरण | साईज | रक्कम | क्र | विवरण | साईज | रक्कम |
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- | १. | १२ पेज | पूर्ण पट्टी | ३०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- | २. | ६ पेज | पुर्ण पट्टी | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- | ३. | १२ पेज | उभी पट्टी | ३०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- | ४. | शुभेच्छा | पॅनल | २,०००/- |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड
महोदय,
वर्धापन दिन विशेषांक २०२६ किंवा दिनदर्शिका २०२७ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................/- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी अॅडव्हान्स रु............./- रोख/चेक/डी.डी./ऑनलाईन जमा करत आहे.
जाहिरातदाराचे नाव :
गाव : तालुका : जिल्हा :
मो.नं. :
₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :-
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : vaibhav11swami@gmail.com
जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
बँक खाते : दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

७ व्या वर्धापन दिनानिमित्त
दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
गौरव समर्पणाचा ! सन्मान ज्ञानदानाचा !!
आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६
सहभागाकरीता नम्र आवाहन
प्रस्ताव पाठवण्याची अंतिम तारीख
गुरुवार, २० ऑगस्ट २०२६



शिक्षण क्षेत्रातील समर्पण, अमूल्य योगदान आणि विशेष शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यासाठी 'दैनिक समर्थ राजयोग' च्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरातील गुणवंत व उपक्रमशील शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.यावर्षी विशेष प्राधान्याने दिव्यांग शाळांमधील शिक्षक/कर्मचारी व दिव्यांग संस्थाचालक यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेतली जाणार आहे. तसेच जिल्हा परिषद, नगरपरिषद व खाजगी शैक्षणिक संस्थांमधील आपल्या विशेष कर्तृत्वाने आदर्शाचा वस्तुपाठ घालणाऱ्या शिक्षकांनाही सन्मानित करण्यात येणार आहे. तरी आपण आपल्या विशेष व कौतुकास्पद कामाचा संक्षिप्त अहवाल (पुराव्यांसह/छायाचित्रांसह) पाठवावा ही विनंती.

वैभव जगदेवी विवेक स्वामी
- संपादक

पुरस्कारासाठी पात्र निकष व वर्गवारी

1. दिव्यांग शाळा व संस्था :
दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.
दिव्यांग बांधवांसाठी विशेष कार्य करणारे संस्थाचालक.
निकष:
दिव्यांग विद्यार्थ्यांच्या पुनर्वसनासाठी, शिक्षणासाठी व आत्मविश्वासासाठी केलेले विशेष व कौतुकास्पद कार्य.

2. सामान्य शाळा वर्गवारी:
जिल्हा परिषद, नगरपरिषद आणि खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळांमधील शिक्षक.
निकष:
गुणवत्तापूर्ण शिक्षण, शैक्षणिक उपक्रमशीलता, सामाजिक सहभाग आणि उत्कृष्ट कार्यकाळ.

प्रस्तावासोबत जोडायची माहिती:
पूर्ण नाव, पत्ता आणि संपर्क क्रमांक, सध्या कार्यरत असलेली संस्था/शाळा व पद, शैक्षणिक कार्यकाळात केलेले कार्य.

आपले प्रस्ताव पाठवण्यासाठी: ईमेल: vaibhav11swami@gmail.com व्हॉट्सअॅप / संपर्क: 9822628521
कार्यालयाचा पत्ता: दैनिक समर्थ राजयोग कार्यालय, सम्राट चौक, शाहुनगर कॉर्नर, बीड - ४३११२२

संपादकीय....

# इराण युद्धामुळे ही व्यक्ती बनली अब्जाधीश

मथळा वाचून दचकलात ना पण हे खरे आहे. कोण आहे हा भाग्यशाली व्यक्ती असा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल. नायजेरियातील या व्यक्तीची अक्षरशः लॉटरी लागली असून सध्या त्याची जगभर चर्चा आहे.

युद्ध कोणासाठी विनाश घेऊन येते, तर काहींसाठी ते अनपेक्षित आर्थिक संधींचे दालन खुले करते. इतिहास साक्षी आहे की, जेव्हा-जेव्हा भू-राजकीय संघर्षांमुळे जागतिक पुरवठा साखळी कोलमडते, तेव्हा काही मोजकेच दूरदर्शी खेळाडू त्या संकटाचे सोने करून दाखवतात. फेब्रुवारी २०२६ च्या उत्तरार्धात अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यामुळे आणि त्यानंतर इराणने जागतिक तेल व्यापाराची मुख्य धमनी असणारी होर्मूझची खाडी बंद केल्यामुळे जगभरात जे प्रचंड ऊर्जा संकट ओढवले, त्याने पुन्हा एकदा याच नियमावर शिक्कामोर्तब केले आहे. या अभूतपूर्व जागतिक संकटामुळे आफ्रिकेतील सर्वात श्रीमंत व्यक्ती अलिको डँगोट यांच्या नेतृत्वाखालील नायजेरियाच्या २० अब्ज डॉलर्सच्या महाकाय 'डँगोट रिफायनरी'चे भाग्यच पालटले आहे. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर न्यूयॉर्क टाइम्ससह विविध आंतरराष्ट्रीय वृत्त माध्यमांनी डँगोट रिफायनरीच्या या अद्भुत व्यावसायिक यशावर सविस्तर प्रकाश टाकला आहे. एका अर्थाने, हे संकट डँगोट यांच्यासाठी जागतिक पटलावर एका नव्या ऊर्जा महासत्तेचा उदय घडवून आणणारे ठरले आहे.

फेब्रुवारी २०२६ च्या अखेरीस इराणविरुद्ध झालेल्या लष्करी संघर्षानंतर जागतिक स्तरावर खनिज तेलाच्या आणि शुद्ध केलेल्या इंधनाच्या पुरवठा साखळीत भूकंपाचे धक्के बसले. जगातील एकूण खनिज तेलाच्या पुरवठ्यापैकी सुमारे एक-पंचमांश हिस्सा अत्यंत संवेदनशील होर्मूझच्या खाडीतून प्रवास करतो. ही मार्गिका अचानक बंद झाल्याने मध्य पूर्व आशियातील तेलाचा पुरवठा पूर्णपणे विस्कळीत झाला. या एकाच झटक्याने आशिया, युरोप आणि आफ्रिकेतील अनेक देशांसमोर ऐनवेळी इंधनाची तीव्र टंचाई उभी ठाकली.

दुसरीकडे, युक्रेनकडून रशियन रिफायनरी आणि टँकर्सवर सतत होत असलेल्या हल्ल्यांमुळे आफ्रिकेत येणाऱ्या रशियन पेट्रोलियम उत्पादनांचा प्रवाह देखील आकुंचन पावला. या दुहेरी संकटामुळे आफ्रिका खंड, ज्याचे पूर्व व उत्तर भाग आपल्या गरजेच्या इंधनासाठी मोठ्या प्रमाणावर मध्य पूर्व आशियावर अवलंबून होते, एकाएकी उघड्यावर पडले. परंतु, नेमक्या याच जागतिक संकटाच्या काळात नायजेरियातील लागोस येथे उभी राहिलेली डँगोट रिफायनरी जागतिक बाजारासाठी एक तारणहार ठरली.

युद्ध सुरू होण्याच्या काही आठवडे आधीच डँगोट यांची २० अब्ज डॉलर्स खर्चून उभारलेली महाकाय रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत झाली होती. जेव्हा जागतिक पुरवठा विस्कळीत झाला, तेव्हा जगभरातील खरेदीदार आणि सरकारांनी पर्यायी पुरवठ्यासाठी डँगोट रिफायनरीशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. एस अँड ग्लोबल एनर्जीच्या अहवालानुसार, एप्रिल आणि मे २०२६ मध्ये डँगोट रिफायनरी ही जगातील सर्वात मोठी जेट इंधन निर्यातक बनली.

डँगोट इंडस्ट्रीजच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, जुलै महिन्यात ही रिफायनरी युरोपची सर्वात मोठी जेट इंधन आणि डिझेल पुरवठादार ठरली. विशेष म्हणजे, या वर्षी प्रथमच या रिफायनरीतून अमेरिकन बाजारातही जेट इंधनाची निर्यात करण्यात आली. या अभूतपूर्व मागणीमुळे आफ्रिकेतील सर्वात श्रीमंत व्यक्ती अलिको डँगोट यांच्या संपत्तीत फेब्रुवारीपासून ५ अब्ज डॉलर्सहून अधिकची भर पडली आहे.

पान १ वरून..

**शिशुगृहातील दोन...**

दोन्ही बालकांची माहिती आणि छायाचित्रे दत्तक प्रक्रियेसाठी पाठविण्यात आली आहेत. तत्पूर्वी कायद्यानुसार त्यांच्या मूळ पालकांचा किंवा नातेवाईकांचा शोध घेणे आवश्यक असल्याने प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत संबंधित बालकांच्या पालकांनी किंवा नातेवाईकांनी आवश्यक पुराव्यांसह कार्यालयांशी संपर्क साधावा. जर दिलेल्या ३० दिवसांच्या मुदतीत कोणीही नातेवाईक समोर आले नाहीत, तर बालकल्याण समिती या बालकांच्या भविष्याबाबत आणि दत्तक प्रक्रियेबाबत कायद्यानुसार योग्य तो पुढील निर्णय घेईल, असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**पाटोदा तालुक्यावर ....**

पावसाने पाठ फिरवल्यामुळे तालुक्यातील विहिरी, बोअरवेल, पाझर तलाव आणि स्थानिक जलसाठ्यांमधील पाणीपातळी खालावली आहे. ऐन पावसाळ्यात अनेक गावांमध्ये पाण्यासाठी नागरिकांना वणवण करावी लागत आहे. अनेक गावांना आता टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असून, ग्रामीण भागातील महिलांना पाण्यासाठी डोक्यावर हंडे घेऊन दूरवर पायपीट करावी लागत आहे.

पशुधनापुढे चाऱ्याचा गंभीर प्रश्न

शेतीसोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार असणारा पशुपालन व्यवसायही संकटात सापडला आहे. माळरानावरील चारा जळून गेल्यामुळे जनावरांना हिरवा चारा मिळणे दुरापास्त झाले आहे. बाजारातील कोरड्या चाऱ्याचे दर गगनाला भिडले असून, पाण्याअभावी जित्राब जगवणे पशुपालकांसाठी कठीण झाले आहे.

शासनाने तातडीने दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

तालुक्यातील बिकट परिस्थिती पाहता महसूल व कृषी प्रशासनाने त्वरित प्रत्येक गावाचा वस्तुनिष्ठ आढावा घ्यावा, पिकांचे पंचनामे करावेत आणि तालुक्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. याशिवाय जनावरांसाठी चारा छावण्यांचे नियोजन आणि टंचाईग्रस्त गावांमध्ये सुरळीत टँकर सुरू करण्याची मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

**दैनिक समर्थ राजयोगचे ....**

बीडचे लिपिक हनुमान नामदेव बहिरवाळ,अस्थीव्यंग निवासी विद्यालय नेकनूर जिल्हा बीडचे लिपिक राजेश राजकुमार कालिके, साईनाथ मतिमंद निवासी विद्यालय नाथापूर जिल्हा बीडचे कार्यालयीन कर्मचारी सुग्रीव महादेव नांदे, बोधवर्धिनी मतिमंद निवासी विद्यालय अंबाजोगाईचे कार्यालयीन कर्मचारी दीपक कमलाकर तांबवे, आदर्श मतिमंद निवासी विद्यालय नांदूर फाटा

पान १ वरून..

जिल्हा बीडचे मानसोपचार तज्ञ श्रीमती वर्षा बंडुराव वाघ, शाहू महाराज निवासी मूकबधिर विद्यालय आष्टीचे काळजीवाहक आप्पासाहेब प्रभाकर मस्के आणि मतिमंद निवासी विद्यालय उमरी तालुका केजचे काळजीवाहक अनिल विठ्ठलराव शिंदे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे.

या आदर्शवत, गुणवंत शिक्षकांचा मान्यवरांच्या शुभहस्ते शनिवार दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी स्मृतिचिन्ह, सेवा गौरव प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ, झाड भेट देऊन त्यांना फेटा बांधून सर्वांच्या उपस्थितीत जाहीर राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात येणार आहे. अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी दिली आहे.

# गोरगरीब रुग्णांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचा आधार!

## डोंगरकिनी व घाटशीळ पारगावच्या दोन रुग्णांना ९० हजारांची मदत मंजूर

पाटोदा ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून गोरगरीब व गरजू रुग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून आर्थिक मदत मिळत आहे. आमदार सुरेश धस यांच्या पुढाकाराने पाटोदा व शिरूर तालुक्यातील दोन रुग्णांच्या उपचारासाठी एकूण ९० हजार रुपयांची मदत मंजूर झाली आहे.





पाटोदा तालुक्यातील डोंगरकिनी येथील ज्योतिबा आश्रूबा पाटोळे यांच्या पोटाच्या शस्त्रक्रिया व उपचारासाठी ४० हजार रुपये, तर घाटशीळ पारगाव येथील रघुनाथ खेडकर यांच्या गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी ५० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत. दोघांवरही अहिल्यानगर येथील अनुक्रमे साई माऊली हॉस्पिटल व साईदीप हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत.

रुग्णांच्या परिस्थितीची माहिती मिळताच आमदार सुरेश धस यांनी तातडीने पाठपुराव्याच्या सूचना दिल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाटोदा येथील रुग्ण मदत विभागाचे स्वीय सहाय्यक ड. महेश बेद्रे, मुंबई येथील विनोद वाघ यांनी विशेष पाठपुरावा केला. तसेच पाटोदा येथील स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी सहकार्य केले.

आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबासाठी मोठ्या उपचारांचा खर्च करणे कठीण असते. अशा वेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी गरजू रुग्णांसाठी मोठा आधार ठरत असून, मतदार संघातील रुग्णांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

# तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत निदा शेख व गौरी चव्हाण प्रथम

## रोहिलागड बीटचे नाव जिल्हास्तरीय अंतिम फेरीत उज्वल केंद्रप्रमुख श्रीमंतराव गंगावणे यांच्या हस्ते सत्कार

रोहिलागड ।प्रतिनिधी

जालना जिल्हा इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत रोहिलागड बीटच्या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता ९ वी ते १० वी तसेच ६ वी ते ८ वी या गटात कु. निदा सत्तार शेख आणि कु. गौरी चव्हाण यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.




अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयाच्या प्रांगणात तालुकास्तरीय स्पर्धेचा चौथा टप्पा पार पडला. अंबड तालुक्यातील विविध बीटमधून प्रथम क्रमांक मिळविलेल्या जिल्हा परिषद तसेच खासगी व्यवस्थापनाच्या विविध माध्यमांच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.

यामध्ये निदा शेख हिने विद्यार्थ्यांवर सोशल मीडियाचा प्रभाव तर गौरी चव्हाण हिने माझा देश माझी जबाबदारी या विषयावर प्रभावीपणे इंग्रजी भाषेत आपले विचार मांडत परीक्षकांची मने जिंकली आणि प्रथम क्रमांक मिळविला.

या उल्लेखनीय यशाबद्दल रोहिलागड बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त श्रीमंतराव गंगावणे यांच्या हस्ते निदा शेख व गौरी चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

या विद्यार्थिनींना शिक्षिका सुषमा बागुल, शिक्षक सोनवणे, तसेच जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक श्री. चव्हाण व शिक्षिका श्रीमती गौर्डे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.आता या स्पर्धेचा पाचवा आणि अंतिम जिल्हास्तरीय टप्पा जालना येथे पार पडणार असून त्यासाठी निदा व गौरी सज्ज झाल्या आहेत. त्यांच्या यशाबद्दल मुख्याध्यापक नलावडे, दाभाडे, गंगावणे, नामदेव गाडगे, चंदनशिव, नाथा टकले, राधा किसन चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.निदा शेख आणि गौरी चव्हाण यांच्या या यशामुळे रोहिलागड बीटच्या शैक्षणिक गुणवत्तेला पुन्हा एकदा झळाळी मिळाली असून परिसरातून दोन्ही विद्यार्थिनींचे कौतुक होत आहे.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६६४/२०२६**
**जनाबाई भ्र. शहादेव रेडे व इतर वि. निरंक**
**मार्फत अँड ए. बी. पौळ, गेवराई**

अर्जदार
१. जनाबाई भ्र. शहादेव रेडे वय ६० वर्षे, धंदा घरकाम
रा. जोडवाडी ता. गेवराई जि. बीड
२. बप्पासाहेब पि. शहादेव रेडे
वय ४० वर्षे, धंदा शेती
रा. जोडवाडी ता. गेवराई जि. बीड
३. अशोक पि. शहादेव रेडे
वय ३५ वर्षे, धंदा- शेती रा. जोडवाडी ता. गेवराई जि. बीड
४. गंगुबाई भ्र. बाळाजी रेडे दय ८५ वर्षे, धंदा सुखवस्तु रा. जोडवाडी ता. गेवराई जि. बीड

ज्याअर्थी मयत शहादेव पि. बाळाजी रेडे हे/हया अनुक्रम दिनांक १३/०५/२०२६ रोजी मौजे जोडवाडी तहत सैदापुर ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळाव असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणण असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत शहादेव पि. बाळाजी रेडे, रा. जोडवाडी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७/०८/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीखः- १३/१०/२०२६

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**टी.सी.हरवली आहे**

अभिषेक विकास ठोंबरे राहणार उंदरी ता.केज जि.बीड या नावाचा टी.सी.केज ते धारुर प्रवासादरम्यान हरवला आहे.आणुन देणारा योग्य बक्षीस दिले जाईल.

मो.क्रमांक ९२७२१८८०७२

# अवैध मटका जुगारातील 'व्हटकर टोळी'वर पोलिसांचा हातोडा.!

कोल्हापूर ।प्रतिनिधी

अवैध मटका जुगाराचा व्यवसाय करणाऱ्या 'व्हटकर टोळी'वर जुना राजवाडा पोलिसांनी कारवाईचा हातोडा उगारला असून, टोळीप्रमुखासह आठ जणांना सहा महिन्यांसाठी कोल्हापूर जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक नीलोत्पल व अपर पोलीस अधीक्षक अण्णासाहेब जाधव यांच्या 'अवैध जुगारमुक्त कोल्हापूर' मोहिमेंतर्गत ही कारवाई करण्यात आली. वारंवार गुन्हे दाखल होऊनही अवैध जुगार सुरूच असल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी प्रिया पाटील यांच्या प्रस्तावावरून महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अन्वये हद्दपारीचे आदेश काढण्यात आले.

हद्दपार केलेले आठ जण

क्रांतीलाल व्हाटकर (७३) - टोळीप्रमुख, विनोद जाधव (३०), शिवाजी शिंदे (५५), धर्मराज कांबळी (२५), शकील सय्यद (२४), अनिकेत अमले (२८), अर्शद मोमीन (३२) आणि शैलेश सव्वर (२०) यांचा समावेश आहे.

१६ ऑगस्ट २०२६ पासून आदेश लागू झाले असून सहा महिन्यांच्या कालावधीत संबंधितांना कोल्हापूर जिल्ह्यात प्रवेशास बंदी घालण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक किरण लोंढे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रविण सावंत, प्रशांत घोरप, सागर डोंगरे, अमर पाटील व मोहन लगारे यांच्या पथकाने केली. अवैध व्यवसायांविरोधात जुना राजवाडा पोलिसांची कारवाई आणखी तीव्र होण्याचे संकेत या कारवाईने दिले आहेत.

दै.समर्थ राजयोग दि.२७/०८/२०२६

**CHANGE IN NAME**

CHANGE IN NAME
I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT
CHANGE IN MY NAME
OLD NAME: PRIYANKA KUMARI MEHTA
CHANGE IN TO MY NEW NAME: MEHTA PRIYANKA HIRALAL
PRESENT ADD: 6368, NEAR BUS STAND, KAIJ, NEHARU
NAGAR, KAIJ, PO: KAIJ, DIST: BEED
MAHARASHTRA - 431123 MO. 8237477777

**कार्यालय**
**जिल्हा वक्फ अधिकारी, जालना,**

**प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, सर्व्हे नं ४८८ जालना ४३१२०३**
**जा.क्र/जिवअ/ चौकशी विभाग-२७/२३३**
**दि.०१ ऑगस्ट २०२६**
**संचिका क्र ६९/३३१/२०२४**

**जाहिर प्रगटन**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजुर करणे बाबत.

वक्फ संस्थेचे नाव आणि पत्ता :- दर्गाह शाह दवाल मलिक मु.पिरकल्याण, ता.जि.जालना

नोंदणी क्र :- मरावमं/जालना/३२८/२०१५

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार गफुरोद्दीन शमशोद्दीन शेख रा. पिरकल्याण ता. जि. जालना यांनी दिनांक २६/०४/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ०५ वर्षाचा व्यवस्थापण समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | गफुरोद्दीन शमशोद्दीन शेख | अध्यक्ष |
| २ | निजामखाँ शबासखाँ पठाण | उपाध्यक्ष |
| ३ | शेख अलीमोद्दीन बशिरोद्दीन | सचिव |
| ४ | शेख छोटुमियाँ शेख नुरमियाँ | सदस्य |
| ५ | अनिसखा इसाखा | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ़ अधिकारी कार्यालय, प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, सर्व्हे नं ४८८ जालना येथे आपले म्हणणे दाखल करावे, विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. यांची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरित/-
**जिल्हा वक्फ अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, जालना.**

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३७४**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- ०२/०६/२०२६**

**जाहिरनामा**

**अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- १. मुख्तार तैय्यब पटेल २.खालेद तैय्यब पटेल**
**प्रकरण :- सिटी सर्व्हे नं. १६६५ न.प.घर नं.१६-७७ चे हस्तांतरण करणे बाबत**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१६-७७ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा,नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

**चतु:सिमा:**
पुर्व :- कालू मिस्त्री
पश्चिम :- रस्ता
दक्षिण :- रस्ता
उत्तर :- रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२६/३७३**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- ०२/०६/२०२६**

**जाहिरनामा**

**अर्जदार श्री.सौ.श्रीमती :- १. मुख्तार तैय्यब पटेल २.खालेद तैय्यब पटेल**
**प्रकरण :- सिटी सर्व्हे नं. १६३२ न.प.घर नं.१६-७८ चे हस्तांतरण करणे बाबत**

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र.(१६-७८ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -------------------- येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

जर कोणास या बद्दल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद,अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा,नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतु:सिमा:
पुर्व :- रस्ता
पश्चिम :- मुन्नू मिस्त्री
दक्षिण :- अजिज खाँन
उत्तर :- मिया टेलर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद,अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६ /सेतू/कावी-२३५ दि.११.०३.२०२६**

**जाहिर प्रगटन**

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,अंबड यांचे न्यायालय अर्जदार बाबासाहेब प्रभाकर शेळके रा.दोदडगांव ता.अंबड जि.जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म/मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे.तसेच संबंधित निबंधकाने त्यांच्या जन्म/मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे.त्याची जन्म/मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.१ नाव ज्ञानेश्वर बाबासाहेब शेळके अर्जदाराशी नाते मुलगा जन्म दिनांक ०४.०६.२००८

निबंधकांनी दिलेल्या जन्म/मृत्यु नोंदीच्या अनुपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिद्ध करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म/मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा.सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही.तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी आज दिनांक ११ / ०६ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी,अंबड**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED- 431122 ( MAHARSHTRA ).

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

जालना

शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६
FRIDAY, DT.28 AUGUST 2026



# आदित्य कृषी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय दर्जाच्या सुविधा!

## विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांकडून संस्थेच्या शैक्षणिक, क्रीडा व विद्यार्थी विकास उपक्रमांचे कौतुक

बीड ।प्रतिनिधी

अमृतकाळातील विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा, कौशल्यविकास, सामाजिक कार्य आणि उद्योजकतेच्या संधींचा लाभ घ्यावा. शेतकरी व ग्रामीण समाजाच्या अडचणी समजून घेऊन शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा रावे कार्यक्रमाचे विद्यापीठ समन्वयक डॉ. राजेश कदम यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाशी संलग्न आदित्य कृषी महाविद्यालयाला डॉ. राजेश कदम यांनी भेट देऊन शैक्षणिक, क्रीडा व विद्यार्थी




विकास सुविधांची पाहणी केली. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. संघर्ष शृंगारपुरे उपस्थित होते.

महाविद्यालयातील ग्रीन कॅम्पस, विविध विभाग, क्रीडांगणे तसेच अत्याधुनिक मल्टीस्पोर्ट कॉम्प्लेक्स (टर्फ) यांची पाहणी करून डॉ. कदम यांनी संस्थेचे अभिनंदन केले. रावे विद्यार्थ्यांशी संवाद साधताना त्यांनी ग्रामीण भागात राबविलेल्या कृषी, सामाजिक व जनजागृती उपक्रमांची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या रील्स व उपक्रमांचे कौतुक करून त्यांना अधिक नावीन्यपूर्ण काम करण्याचे मार्गदर्शन केले.

डॉ. संघर्ष शृंगारपुरे यांनी विद्यार्थ्यांच्या विद्यापीठस्तरीय क्रीडा सहभाग व यशाचे कौतुक केले. बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस व मल्टीस्पोर्ट कॉम्प्लेक्स यांसारख्या सुविधांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य श्याम भुतडा यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध सुविधांची माहिती दिली. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमासाठी डॉ. रामप्रसाद मोरे, डॉ. डी.बी. सातपुते, डॉ. पी.डी. खेडकर, डॉ. वीरेंद्र कुमार, डॉ. एन.यू. ठोके, प्रा. व्ही.एस. मिसाळ, प्रा. एस.जी. बोरडकर, प्रा. ओ.एन. राऊत व प्रा. धावणे यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक डॉ. डी.बी. सातपुते यांनी, तर आभार डॉ. रामप्रसाद मोरे यांनी मानले.

# नेपाळ महापुरात बीड जिल्ह्यातील नागरिक अडकलेले असल्यास

## कुटुंबियांनी जिल्हा प्रशासनाशी तात्काळ संपर्क साधावा - आवाहन

बीड ।प्रतिनिधी

नेपाळमधील रसुवा जिल्ह्यात भोटे कोशी नदीला आलेल्या भीषण पुरामुळे तेथील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या आपत्तीत विविध देश आणि राज्यातील अनेक नागरिक तसेच पर्यटक अडकून पडल्याची माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्यातील जे नागरिक किंवा पर्यटक सध्या नेपाळमध्ये अडकले आहेत, किंवा ज्यांचा आपल्या कुटुंबीयांशी संपर्क होऊ शकत नाही, त्यांची अचूक माहिती संकलित करण्यासाठी आणि त्यांना आवश्यक ती मदत व समन्वय उपलब्ध करून देण्यासाठी मुंबई मंत्रालयातील महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून एक विशेष लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. तरी नागरिकांनी घाबरून न जाता अधिकृत माध्यमांद्वारे माहिती नोंदवावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नेपाळमध्ये अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी तातडीने हींींि:// सर्शीरिींळरश्र.ारहरीशेल.ळप/डरहूरींर्सीश्रष/ या लिंकवर जाऊन सविस्तर माहिती भरावी. लिंकवर माहिती भरण्यासोबतच संबंधित नागरिकांनी किंवा त्यांच्या नातेवाईकांनी जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे दूरध्वनी क्रमांक ०२४४२-२९९२९९, अथवा टोल फ्री क्रमांक १०७७ क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा. नातेवाईकांनी लिंकवर माहिती नोंदविताना संबंधित व्यक्तीचे संपूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, नेपाळमधील सध्याचे ठिकाण किंवा हॉटेलचा पत्ता, त्यांच्या प्रवासाचा तपशील आणि महाराष्ट्रातील कुटुंबीयांचा संपर्क क्रमांक अचूकपणे नमूद करावा. नेपाळमधील आपत्तीग्रस्त भागात अडकलेल्या प्रत्येक नागरिक आणि पर्यटकाच्या सुरक्षिततेसाठी जिल्हा प्रशासन सर्व संबंधित यंत्रणांशी सतत समन्वय साधत असून, त्यांना सुखरूप परत आणण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जात आहेत. असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळविले आहे.

# शिवाजीनगर पोलीस ठाण्याचा सामाजिक पुढाकार

## रॅलीऐवजी रक्तदानाचा विधायक उपक्रम

बीड ।प्रतिनिधी

ईद-ए-मिलाद-उन-नबी निमित्त प्रस्तावित रॅलीच्या अनुषंगाने शिवाजीनगर पोलीस ठाण्याने संबंधित युवक व संयोजकांशी संवाद साधून सकारात्मक व समाजाभिमुख उपक्रमास प्रोत्साहन दिले. मागील तीन वर्षांपासून शेख मोहसीन व सोनू शेठ यांच्या पुढाकाराने ईद-ए-मिलाद निमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी रॅलीचे आयोजन करणाऱ्या युवकांनीही पोलिसांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत रॅलीऐवजी या रक्तदान शिबिरात सहभाग नोंदविला.



शिबिरात एकूण ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या उपक्रमातून युवकांना समाजाभिमुख कार्याशी जोडत सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मतेचा सकारात्मक संदेश देण्यात आला. या सकारात्मक प्रतिसादाबद्दल संयोजकांनी सहभागी युवक व रक्तदात्यांचे आभार मानले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या या पुढाकारामुळे शहरातील इतर सामाजिक संघटना व विविध गटांनाही जयंती व उत्सवांच्या निमित्ताने समाजोपयोगी व विधायक उपक्रम राबविण्यास प्रेरणा मिळाली आहे.

# शिवसेना कार्यालयात प्रा. विजय पवार यांचा उत्साहात वाढदिवस साजरा!

## जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या हस्ते सत्कार, शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व, कोचिंग क्लासेसचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष व मराठा सेवक प्रा. विजय पवार यांचा वाढदिवस शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिल्हा मध्यवर्ती कार्यालय, सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स, बीड येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर यांच्या हस्ते प्रा. पवार यांचा यथोचित सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन, युवासेना उपजिल्हा युवाधिकारी अश्फाक




भाई शेख, अँड. संतोष काकडे, महाराष्ट्र उपकेसरी पैलवान अक्षय शिंदे, भैरवनाथ देवस्थान जरूड ट्रस्टचे अध्यक्ष गणेश काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना गणेशभाऊ वरेकर म्हणाले की, विजय पवार यांना शैक्षणिक क्षेत्राची मोठी आस्था असून त्यांच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी घडत आहेत. तसेच मराठा समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी ते सातत्याने कार्यरत असून विविध सामाजिक प्रश्नांसाठीही त्यांची धडपड सुरू असते. त्यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थना त्यांनी केली.

यावेळी श्रीकृष्ण गायके, सचिन काकडे, उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, शाम काकडे, काका जोगदंड, सचिन काकडे, संदिप शिंदे, गजू काकडे, बाबू कुटे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काटकर कॉलनी गांजा प्रकरणात दोन महिलांना अटक!

## राजारामपुरी पोलिसांची धडक कारवाई, आर्थिक रसद पुरवणाऱ्यांपर्यंत तपास पोहोचला

कोल्हापूर ।प्रतिनिधी

काटकर कॉलनीतील गांजा प्रकरणाच्या तपासाला नवे वळण मिळाले असून, गांजा खरेदीसाठी आर्थिक मदत केल्याच्या आरोपावरून राजारामपुरी पोलिसांनी दोन महिलांना अटक केली आहे. या कारवाईमुळे अमली पदार्थांच्या व्यवहारामागील आर्थिक साखळी तपासण्यास वेग आला आहे.

२१ ऑगस्ट २०२६ रोजी महादेव मंदिराजवळ पोलिसांनी अनिकेत संतोष चौगुले (वय २७) याच्याकडून २ किलो ५३७ ग्रॅम गांजा जप्त केला. त्याची किंमत ५० हजार ७४० रुपये, तसेच १ लाख २० हजार रुपयांचा आयफोन १७ प्रो मॅक्स व इलेक्ट्रॉनिक वजनकाटा, असा एकूण १ लाख ७१ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. याप्रकरणी राजारामपुरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५३१/२०२६ अन्वये एनडीपीएस कायद्यानुसार गुन्हा दाखल आहे.

आर्थिक साखळीचा शोध





गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक रुपेश इंगळे यांनी हाती घेतल्यानंतर गांजा खरेदीसाठी पैसा कोणी पुरवला, याचा तपास सुरू करण्यात आला. तपासात सुनिता बाबासो चौरगे (वय ५९) व स्नेहल संजय चौगुले (वय २७) यांनी रोख तसेच ऑनलाइन माध्यमातून पैसे पुरवल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. दोघींना २६ ऑगस्ट २०२६ रोजी अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

'नशामुक्त कोल्हापूर' अभियानाला बळ

पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'नशामुक्त कोल्हापूर' अभियानांतर्गत गांजा विक्रेते, पुरवठादार, खरेदीदार आणि आर्थिक मदत करणाऱ्यांपर्यंत तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नीलोत्पल, अपर पोलीस अधीक्षक आप्पासाहेब जाधव व शहर विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी प्रिया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. पोलीस निरीक्षक विकास जाधव, पोलीस उपनिरीक्षक रुपेश इंगळे, अमोल पाटील, कृष्णात पाटील, मिलिंद बांगर, विशाल शिरगावकर, शाहू तळेकर, गजानन हराळे, नितीश बागडी, राहुल कदम, दिगंबर कुंभार, सुरज भोपळे व सचिन वायदडे यांच्या पथकाने कारवाईत सहभाग घेतला.

पुरवठादार कोण? पैशांची साखळी किती खोल?

दोन महिलांपर्यंत तपास पोहोचला असला तरी गांजाचा मूळ पुरवठादार कोण, आर्थिक साखळी किती मोठी आहे आणि या व्यवहारामागे आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध पोलिसांकडून सुरू आहे. त्यामुळे पुढील कारवाईकडे कोल्हापूरकरांचे लक्ष लागले आहे.

# राखीच्या धाग्यात गुंफली कृतज्ञता..!

## कवठेमहांकाळ पोलिसांच्या मनगटावर बांधली राखी, श्री अंबिका महिला मंचाचा हृदयस्पर्शी उपक्रम

कवठेमहांकाळ : सनी लोंढे

रक्षाबंधनाच्या निमित्ताने कुटुंबापासून दूर राहून नागरिकांच्या सुरक्षेसाठी कर्तव्य बजावणाऱ्या पोलिस बांधवांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्री अंबिका महिला मंच, कवठेमहांकाळ यांच्या वतीने पोलीस ठाण्यात अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे करण्यात आले.

महिला मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मनगटावर राखी बांधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलिसांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य, तर महिलांच्या मनात आपल्या रक्षणकर्त्यांप्रती कृतज्ञतेची भावना दिसून आली.

सणाच्या दिवशी आपण कुटुंबासोबत असतो; मात्र समाजाच्या सुरक्षेसाठी वर्दीतील भाऊ कर्तव्यावर असतो, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. श्री अंबिका महिला मंचाच्या अध्यक्षा सौ. शितल वैभव गुरव यांनी पोलीस आणि समाजातील भगिनींमधील प्रेम, विश्वास व बंधुभाव दृढ करणे हा उपक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले.

पोलीस निरीक्षक प्रवीणकुमार



कांबळे यांनी, नागरिकांच्या संरक्षणासाठी आम्ही सदैव तत्पर राहू, अशी ग्वाही देत महिला मंचाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी कवठेमहांकाळ नगरपंचायत नगराध्यक्षा शुभांगी शिंदे, प्रमिला पाटील, सुलोचना माने, डॉ. हर्षला कदम, मिनाक्षी माने, सविता देशमुख यांच्यासह श्री अंबिका महिला मंचाच्या पदाधिकारी व सदस्य उपस्थित होत्या. तसेच श्री बाळासाहेब गुरव (बापू) हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, कवठेमहांकाळ आणि एम्स स्कूल, कवठेमहांकाळ येथील शिक्षक स्टाफही उपस्थित होता.

राखीचा धागा छोटा पण नातं मनाचं..!

मनगटावर बांधलेली राखी म्हणजे तुम्ही आमचे रक्षण करता, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, या कृतज्ञतेची भावना. स्वतःच्या बहिणीपासून दूर असलेल्या वर्दीतील भावाच्या मनगटावर समाजातील भगिनींनी राखी बांधून माणुसकीचा हा सुंदर धागा अधिक घट्ट केला. श्री अंबिका महिला मंचाचा हा उपक्रम पोलीस आणि समाजातील विश्वास, सन्मान व आपुलकीचे नाते अधोरेखित करणारा ठरला.

# चार वर्षे शिक्षक गायब शिक्षण विभाग झोपेत

## रामगव्हाणच्या जिल्हा परिषद शाळेला पालकांनी ठोकले टाळे एका शिक्षकावर पहिली ते पाचवीचा भार

शिक्षक द्या नाहीतर सीईओंच्या दालनातच वर्ग भरवू संतप्त पालकांचा प्रशासनाला इशारा

घुंगर्डे हादगाव ।प्रतिनिधी

शाळा आहे विद्यार्थी आहेत शिक्षकांची पदे मंजूर आहेत मग शिक्षक कुठे आहेत? असा संतप्त सवाल अंबड तालुक्यातील रामगव्हाण बु. येथील नूतन वस्ती जिल्हा परिषद शाळेतील पालकांनी शिक्षण विभागाला केला आहे. मंजूर दोन शिक्षकांपैकी एक शिक्षक तब्बल सव्वाचार वर्षांपासून गैरहजर असल्याचा आरोप करत संतप्त पालक व ग्रामस्थांनी अखेर शाळेलाच टाळे ठोकले.

रामगव्हाणच्या शाळेतील शिक्षक आबासाहेब अमृते हे २७ जून २०२२ पासून रजेवर असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.सव्वाचार वर्षे उलटूनही शिक्षकाची पर्यायी व्यवस्था झाली नसल्याने पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक गाडा एका शिक्षकाच्या खांद्यावर ढकलण्यात आला आहे. एकाच शिक्षकाने पाच वर्ग सांभाळायचे अध्यापन करायचे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करायच्या मग गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा तरी कशी करायची? असा सवाल संतप्त पालकांनी उपस्थित केला आहे.चार वर्षे निवेदने तरीही प्रशासनाच्या कानावर जूं नाहीशाळेला शिक्षक मिळावा यासाठी पालकांनी गटशिक्षण अधिकारी,शिक्षण अधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वारंवार निवेदने दिल्याचा दावा केला आहे.मात्र निवेदने मागण्या आणि विनंत्या करूनही शिक्षकाची नियुक्ती न झाल्याने पालकांचा संताप आता उफाळून आला आहे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणाशी खेळ सुरू



असल्याचा आरोप करत पालकांनी शाळेच्या प्रवेशद्वारालाच टाळे ठोकून प्रशासनाचा निषेध केला. शिक्षणाचा अधिकार कागदावर मोठमोठ्या अक्षरांत लिहिणाऱ्या प्रशासनाला ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या वर्गखोल्यांतील वास्तव दिसत नाही का? चार वर्षे एका शाळेत शिक्षकाची कमतरता असताना संबंधित यंत्रणा नेमकी कोणाची वाट पाहत आहे? असे सवाल आता उपस्थित होत आहेत.

आठ दिवसांत शिक्षक द्या अन्यथा सीईओंच्या दालनात वर्ग प्रशासनाने आता तरी जागे व्हावे अशी मागणी करत पालकांनी थेट इशारा दिला आहे. येत्या आठ दिवसांत शाळेला शिक्षक उपलब्ध करून दिला नाही तर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनातच वर्ग भरवण्यात येईल असा इशारा संतप्त पालकांनी दिला आहे.

हा इशारा केवळ आंदोलनाचा नसून ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उभ्या राहिलेल्या संतापाचा आवाज आहे. एका शिक्षकावर पाच वर्गांचा भार टाकून प्रशासनाने विद्यार्थ्यांचे भवितव्य वाऱ्यावर सोडू नये अशी मागणी पालकांनी केली आहे.यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष भारत चांदणे ग्रामपंचायत सदस्य मालन गाढे,सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब साबळे,चंद्रकांत डोमाळे,शेख नूर शेख,संदीप गायकवाड,इंदर साबळे, भगवान नागरे,प्रयागबाई पांढरे,पूनम गाढे,शकुंतला गायकवाड यांच्यासह महिला पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता प्रश्न एकच शाळेला टाळे पालकांनी ठोकले पण शिक्षण विभागाच्या डोळ्यांवरचे टाळे कधी उघडणार

# चोरीस गेलेले सोने महिलांना परत करत रक्षाबंधनाच्या

## पूर्वसंध्येला पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची अनोखी राखी भेट..!

बीड ।प्रतिनिधी

रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला चोरीस गेलेले सोने महिलांना परत मिळवून देत बीड पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपली. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांनी दिलेल्या निर्देशानुसार पोलिसांनी चोरीच्या घटनांचा तत्पर तपास करून हस्तगत केलेले सोने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून संबंधित महिलांना परत केले. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर चोरीस गेलेले सोने संबंधित महिलांना परत मिळाल्यास त्यांच्यासाठी ही मोठी भावनिक आणि आनंदाची बाब ठरेल, या उद्देशाने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी विशेष प्रयत्न करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार ज्यांचे सुने चोरीला गेले होते त्यांना सदरील सोने परत दिल्यामुळे या महिलांना पोलीस अधीक्षकांकडून अनोखी राखीभेट मिळाल्याने महिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभारले होते.

आज रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब यांच्या उपस्थितीत व हस्ते दोन पीडित महिलांना त्यांचे सोने परत करण्यात आले. यातील पहिल्या घटनेत राजीव गांधी चौक, बीड येथुन राहते घरातुन सोन्या चांदीचे दागिणे चोरीस गेले बाबतचा गुन्हा दाखल होता सदर गुन्हयाचा पोलिसांनी



सखोल तपास करुन तपासादरम्यान एकुण ३,३७,२८०/- रुपये एवढ्या रक्कमेचे सोन्या चांदीणे दागिणे हस्तगत केले आहेत. तर दुसऱ्या घटनेत परळी येथील महिला नामे आरती दिपक अरबुने या महिलेचे

बीड बस स्थानक येथे बस मध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेवुन चोरीस गेलेले २८,९८५/- रुपये किंमतीचे सोण्याचे मिनी गंठण पोलिसांनी तत्पर कारवाई करून आरोपीस अटक करुन हस्तगत केले आहे. कायद्याची सर्व प्रक्रिया पूर्ण करून दोन्ही महिलांना त्यांचे सोने परत करण्यात आले आहे. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला आपल्या कष्टाने मिळवलेले दागिने पुन्हा मिळाल्याने दोन्ही महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद दिसून आला. त्यांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब तसेच बीड पोलिसांचे आभार मानले. चोरीस गेलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नागरिकांना परत मिळवून देण्यासाठी बीड पोलिसांकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. ऋषिकेश शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शीतलकुमार बल्लाळ साहेब तसेच पोलीस अंमलदार विलास कांदे, राजाभाऊ जाधव, महिला पोलीस अंमलदार सिमा गायकवाड, रामलीला गुंजाळ, शिवा घोलप, अनंत गिरी, ज्ञानेश्वर मराडे आदींनी केली आहे.

## रक्षाबंधन : भावाबहिणीच्या अतूट प्रेमाचा आणि विश्वासाचा पवित्र सण

२८ ऑगस्ट : रक्षाबंधन विशेष..

रक्षाबंधन हा भाऊ-बहिणीच्या पवित्र, प्रेमळ आणि विश्वासाच्या नात्याचा सण असून तो दरवर्षी श्रावण पौर्णिमेला साजरा केला जातो. या दिवशी बहीण भावाला राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते, तर भाऊ तिच्या रक्षणाचे वचन देतो. त्यामुळे हा सण प्रेम, आपुलकी आणि निष्ठेचे प्रतीक मानला जातो.

रक्षाबंधनाला राखी पौर्णिमा, नारळी पौर्णिमा किंवा पोवती पौर्णिमा असेही संबोधले जाते. भारतीय संस्कृतीत नाती जपण्याला विशेष महत्त्व असून, भावंडांच्या नात्यातील जिव्हाळा अधिक दृढ करणारा हा सण आहे.

पुराणकथांनुसार माता लक्ष्मी यांनी राजा बली यांना राखी बांधून भगवान विष्णूंना परत वैकुंठात आणले. तसेच द्रौपदीने श्रीकृष्णांच्या करंगळीला वस्त्र बांधल्यावर श्रीकृष्णांनी तिच्या रक्षणाचे वचन दिले. इतिहासात राणी कर्णावती यांनी सम्राट हुमायूं यांना राखी पाठवून संरक्षणाची विनंती केली होती, अशीही प्रसिद्ध कथा सांगितली जाते.

राखीमध्ये वापरले जाणारे रेशीम, चंदन, केशर, तांदूळ, दुर्वा आदी घटक आरोग्यदृष्ट्याही उपयुक्त मानले जातात. त्यामुळे रक्षाबंधनाला धार्मिक, सांस्कृतिक आणि वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

समस्त भावाबहिणींना रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा.!

संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी
रा. एकता चौक, श्रीगुरूदेव प्रार्थना मंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
व्हॉट्सप : ९४२३७१४८८३



## पत्रकार मंदार गोंजारींवरील कारवाईच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने!

**विद्यार्थ्यांच्या फी-शिष्यवृत्तीचा प्रश्न मांडल्याने गुन्हा दाखल केल्याचा आरोप; कारवाई मागे घेण्याची डॉ. गणेश ढवळे यांची मागणी**

बीड ।प्रतिनिधी

एबीपी माझाचे प्रतिनिधी मंदार गोंजारी यांनी सीओईपीमधील विद्यार्थ्यांच्या फी व शिष्यवृत्तीच्या प्रश्नांवर प्रतिक्रिया घेतल्याप्रकरणी पुणे पोलिसांत गुन्हा दाखल झाल्याच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी पत्रकारांवरील दडपशाहीचा धिक्कार असो, लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरील हल्ला सहन करणार नाही, हुकूमशाही चालणार नाही अशा घोषणा देण्यात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, पोलिस महासंचालक व विशेष पोलिस महानिरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.

डॉ. ढवळे यांनी सांगितले की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमादरम्यान सीओईपीच्या विद्यार्थ्यांनी फी व शिष्यवृत्तीच्या समस्या मांडल्या. विद्यार्थ्यांचा हा आवाज माध्यमातून समाजासमोर आणल्यामुळेच गोंजारी यांच्यावर कारवाई झाल्याचा आरोप त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रसिद्धी देणे हे पत्रकारितेचे कर्तव्य असून, गोंजारी यांच्यावरील गुन्हा तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

आंदोलनात शेख युनुस, बाळासाहेब मोरे पाटील, अशोक येडे, सादेक सय्यद, रामधन जमाले, हनुमान घोडके, भीमराव कुट, प्राचार्य डी. जी. तांदळे, डॉ. संजय तांदळे, बाजीराव ढाकणे, आण्णासाहेब मतकर, शेषेराव वीर, प्रविण आनेराव, जयसिंगराजे वीर आदी सहभागी झाले.

# 'घरी सोडतो' म्हणत आजी-आजोबांना लुटणारा सराईत जेरबंद!

## सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची दमदार कारवाई, ८ गुन्ह्यांची उकल, १४.३५ लाखांचा मुद्देमाल जप्त

सांगली ।प्रतिनिधी

वयस्कर आजी-आजोबांना मोटारसायकलवरून घरी सोडण्याचे आमिष दाखवून निर्जनस्थळी नेऊन सोन्याचे दागिने लुटणाऱ्या सराईत आरोपीला सांगली स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने जेरबंद केले. मारुती बबाजी कोटे (वय ४७, रा. हुलजंती, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) असे आरोपीचे नाव आहे.

पोलिसांच्या तपासात मिरज ग्रामीण, जत, कवठेमहांकाळ व आटपाडी पोलीस ठाण्यांतील तब्बल ८ गुन्ह्यांची उकल झाली असून, १३ लाख ३५ हजार रुपयांचे सुमारे ९० ग्रॅम सोन्याचे दागिने व १ लाख रुपये किमतीची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल, असा एकूण १४ लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

'मी पुजारी आहे... बालूमामाच्या मेंढ्या आल्या आहेत'

१६ ऑगस्ट २०२५ रोजी बेळंकी येथे एका वयस्कर महिलेला आरोपीने आपण पुजारी असल्याचे सांगून बालूमामाच्या मेंढ्या आल्या आहेत, दर्शन करून घरी सोडतो, असे सांगत मोटारसायकलवर बसवले. निर्जनस्थळी नेऊन तिच्या गळ्यातील सोन्याची बोरमाळ हिसकावून आरोपी पसार झाला. यानंतर मिरज ग्रामीण पोलिसांत गुन्हा दाखल झाला.



याच पद्धतीने जत, कवठेमहांकाळ व आटपाडी तालुक्यांत बसची वाट पाहणाऱ्या वयस्कर नागरिकांना लक्ष्य केल्याचे तपासात निष्पन्न झाले.

चाणक्य चौकात सापळा, आरोपी ताब्यात

मालमत्ते विरुद्धच्या गुन्ह्यांतील आरोपींवर कारवाईच्या सूचना पोलीस अधीक्षक तुषार दोशी व अपर पोलीस अधीक्षक कल्पना बारवकर यांनी दिल्या होत्या. पोलीस निरीक्षक संजीव झाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत निशाणदार यांनी पथक तयार केले.२४ ऑगस्ट २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीवरून चाणक्य चौक, कुपवाड येथे सापळा रचून मारुती कोटे याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्यांची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीने लुटलेले दागिने विविध सोनारांकडे विकल्याचे समोर आले. पोलिसांनी मणीमंगळसूत्र, ५ बोरमाळ, ७ कानातील कुंडले, २ कर्णफुले, २ झुमके, २ कानातील साखळ्या, ६ बदाम, २ चुंगड्या व २ पुडके असा सुमारे ९० ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल जप्त केला. गुन्ह्यातील होंडा युनिकॉर्नही हस्तगत करण्यात आली.

मिरज ग्रामीण, जत, कवठेमहांकाळ आणि आटपाडी पोलीस ठाण्यांतील गु.र.नं. ४४६/२०२५, ४४७/२०२५, ३४४/२०२५, २२९/२०२५, ४७७/२०२५, ४८७/२०२५, ६०/२०२५ व २२६/२०२५ या आठ गुन्ह्यांची उकल झाली आहे.

मारुती कोटे हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून कर्नाटकातही त्याच्यावर जबरी चोरीचे गुन्हे असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असून तपास सुरू आहे.

वयस्कर नागरिकांनी सावध राहावे

अनोळखी व्यक्तीने वाहनावरून घरी सोडण्याची ऑफर दिल्यास वयस्कर नागरिकांनी सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत निशाणदार करीत आहेत.

कारवाईत सहभागी पथक : पोलीस निरीक्षक संजीव झाडे, सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत निशाणदार, सहाय्यक फौजदार अमित परीट, सुभाष सूर्यवंशी, संदीप नलवडे, विनायक सुतार, सोमनाथ गुंडे, अनिल कोळेकर, अमिरशा फकिर, नागेश खरात, मोतीराम खोत, सागर लवटे, अमर नरळे, प्रकाश पाटील, दरीब बंडगर, सतीश माने, सागर टिंगरे, राजाराम मुळे, संदीप गुरव, उदय माळी, विक्रम खोत, करण परदेशी, विजय पाटणकर, अजय पाटील, कॅप्टन गुंडावडे यांनी कारवाईत सहभाग घेतला.

## भोकरदनचे पाटबंधारे कार्यालय रामभरोसे

# पाच जणांचा मंजूर कर्मचारीवर्ग कार्यालयात मात्र शुकशुकाट

## धुळखात फायली वाढलेले गवत अन् अस्ताव्यस्त कारभार

भोकरदन इसरारखान पठाण :- शेतकऱ्यांच्या पाण्याशी संबंधित महत्त्वाच्या कामकाजाची जबाबदारी असलेल्या भोकरदन येथील लघु पाटबंधारे कार्यालयाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे सर्वेक्षण तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी यांच्या कार्यालयाला अचानक भेट दिली असता कार्यालयात अपेक्षित कर्मचारी उपस्थित नसल्याचे तसेच कार्यालयाच्या परिसरात अस्वच्छता व अस्ताव्यस्तपणा असल्याचे निदर्शनास आले.

कार्यालयात उपविभागीय अभियंता धनंजय चौधरी यांच्यासह तीन टेक्निकल असिस्टंट आणि एक शिपाई असा एकूण पाच जणांचा कर्मचारीवर्ग मंजूर असल्याची माहिती आहे. मात्र प्रत्यक्ष भेटीवेळी उपस्थिती अत्यल्प असल्याचे दिसून आले. याबाबत विचारणा केली असता एका टेक्निकल असिस्टंटने उपविभागीय अभियंता कामानिमित्त जालना येथील कार्यालयात गेल्याचे सांगितले. इतर कर्मचारी कुठे आहेत याबाबत मात्र स्पष्ट माहिती मिळाली नाही.कार्यालयाबाहेर गवत आत फायलींचा पसाराकार्यालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर गवत आणि झाडाझुडपांची वाढ झाल्याचे दिसून आले. कार्यालयात प्रवेश केल्यानंतर अस्ताव्यस्त खुर्च्या धुळीने माखलेल्या फायली टेबलावरील कागदपत्रांचा पसारा आणि काही ठिकाणी अस्वच्छ वातावरण दिसून आले. त्यामुळे शेतकरी व नागरिकांच्या कामकाजासाठी असलेल्या कार्यालयाच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.साहेबांची खुर्ची रिकामी नागरिकांची प्रतीक्षा

उपविभागीय अभियंत्यांची केबिन उघडी असली तरी त्यांची खुर्ची रिकामी होती. कामानिमित्त कार्यालयात येणाऱ्या शेतकरी व नागरिकांना अधिकारी उपलब्ध होत नसतील, तर त्यांच्या समस्या




मांडायच्या कुठे असा प्रश्न उपस्थित होत आहे. विशेषत पाणी धरणांची देखभाल-दुरुस्ती आणि सिंचनाशी संबंधित प्रश्नांसाठी शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांची भेट आवश्यक असते.

महापुरुषांच्या छायाचित्रांकडेही दुर्लक्ष

कार्यालयातील महापुरुषांची काही छायाचित्रे तिरकी लटकलेली तर काही छायाचित्रे अलमारीवर धुळखात पडल्याचे दिसून आले. सरकारी कार्यालयात महापुरुषांच्या छायाचित्रांची योग्य निगा राखली जाणे अपेक्षित असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र दिसत आहे.पाच लघु पाटबंधारे प्रकल्पांचा कारभार

या कार्यालयाच्या अखत्यारित भोकरदन व जाफ्राबाद तालुक्यांतील बानेगाव, पळसखेडा दाभाडी,चांधई एक्को,शिंदी आणि रेलगाव या पाच लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या देखभाल-दुरुस्तीशी संबंधित कामकाज असल्याची माहिती आहे. त्यामुळे या कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची उपस्थिती आणि प्रकल्पांच्या देखभालीचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो.एखाद्या प्रकल्पात तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास किंवा शेतकऱ्यांना पाण्याबाबत समस्या उद्भवल्यास तातडीने प्रतिसाद देण्यासाठी संबंधित यंत्रणा उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे कार्यालयीन उपस्थितीबाबत स्पष्टता असणे गरजेचे आहे.

ऑन ड्यूटी चा हिशेब तपासण्याची मागणी

कार्यालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती किती आहे, याबाबत प्रश्न निर्माण झाल्याने वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अचानक तपासणी करावी अशी मागणी होत आहे. हजेरीपत्रक बायोमेट्रिक उपस्थिती दौरा नोंदवही रजा नोंदवही तसेच कार्यालयीन कामकाजाच्या नोंदी तपासल्यास अधिकारी-कर्मचारी कोणत्या दिवशी कुठे कार्यरत होते याची वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते.वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेण्याची गरज

शेतकऱ्यांच्या पाण्याशी संबंधित महत्त्वाच्या कार्यालयाची अशी अवस्था राहणे योग्य नाही. कार्यालयातील स्वच्छता कर्मचारी उपस्थिती आणि कामकाज याबाबत जिल्हा प्रशासन व संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन वस्तुस्थिती तपासावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी असलेल्या कार्यालयाचा कारभार व्यवस्थित सुरू आहे की तो रामभरोसे आहे याचा खुलासा आता संबंधित विभागाने करणे आवश्यक आहे.




## साई मॉडर्न इंग्लिश शाळेत एचआयव्ही/एड्स माहिती व मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

बदनापुर ।प्रतिनिधी

दि. २७ ऑगस्ट: आज आपल्या शाळेत वर्ग ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत एचआयव्ही/एड्स माहिती व मार्गदर्शन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.पौगंडावस्थेतील विद्यार्थ्यांना आरोग्याविषयी योग्य, शास्त्रीय व मोकळी माहिती मिळावी तसेच समाजमनातील अंधश्रद्धा व गैरसमज दूर व्हावेत, या उद्देशाने ही कार्यशाळा घेण्यात आली.

मार्गदर्शन व महत्त्वाचे मुद्दे

कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक डॉ. अनिल खंडाळे यांनी एचआयव्ही/एड्स संदर्भात सविस्तर शास्त्रीय माहिती देऊन या आजाराविषयी पसरलेल्या गैरसमजुतींवर प्रकाश टाकला. तसेच डॉ. महादेव गिते यांनी विद्यार्थ्यांना वैयक्तिक स्वच्छता, शारीरिक बदल आणि आरोग्यदायी सवयींचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध शंकांचे त्यांनी अत्यंत सोप्या भाषेत निरसन केले.



## चंदनझिरा पोलिसांना मिळणार हक्काची नवी वास्तू

# नवीन पोलीस ठाण्याचे दिमाखात भूमिपूजन आ. अर्जुन खोतकर,आ.नारायण कुचे यांच्या हस्ते शुभारंभ

जालना शेख फारुक :- एमआयडीसी परिसरातील वाढत्या लोकसंख्येसह गुन्हेगारीवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण ठेवण्यासाठी महत्त्वाचे ठरणाऱ्या चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या नवीन इमारतीच्या बांधकामाचा श्रीगणेशा गुरुवारी दि.२७ उत्साहपूर्ण वातावरणात झाला.त्रिमूर्ती चौकातील नियोजित जागेवर आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार नारायण कुचे यांच्या शुभहस्ते भूमिपूजन करण्यात आले.

गृह विभाग तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या माध्यमातून या नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीस मंजुरी देण्यात आली आहे. अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशी ही वास्तू उभी राहिल्यानंतर चंदनझिरा परिसरातील नागरिकांना अधिक सक्षम व गतिमान पोलीस सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.पोलीस बँडच्या दणदणाटात मान्यवरांचे स्वागत


भूमिपूजन सोहळ्याची सुरुवात पोलीस मुख्यालयाच्या बँड पथकाच्या शिस्तबद्ध वादनाने झाली. पोलीस बँडच्या सुरांनी परिसर दुमदुमून गेला आणि प्रमुख पाहुण्यांचे तसेच उपस्थित मान्यवरांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी,ज्येष्ठ उद्योजक घनशामजी गोयल,माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर,उद्योजक सतीश गोयल,डी.बी.सोनी,अर्जुन गेही यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी,पोलीस अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती.पोलीस अधिकारी लोकप्रतिनिधींसह नागरिकांची गर्दी भूमिपूजन सोहळ्यास जालना महानगरपालिकेतील सर्वपक्षीय नगरसेवक विविध गावांचे पोलीस पाटील, सरपंच,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस उपअधीक्षक बाळासाहेब पवार,जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे व शाखांचे प्रभारी अधिकारी,शासकीय कार्यालयांचे प्रमुख आणि माध्यम प्रतिनिधींचीही मोठी उपस्थिती होती.

चंदनझिरा परिसराच्या दृष्टीने नवीन पोलीस ठाण्याची इमारत महत्त्वपूर्ण ठरणार असून वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांना अधिक सक्षम पायाभूत सुविधा मिळणार आहेत.

# लोणगावच्या घरकुल योजनेत घोळ च घोळ पात्रांना अपात्र ठरवून गरिबांच्या हक्कावर गदा

## घरकुलाच्या यादीने ग्रामस्थ संतप्त पंचायत समितीवर धडक बीडीओंना निवेदन पुनर्सर्व्हेची मागणी अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा



भोकरदन इसरारखान पठाण :- लोणगाव येथील पंतप्रधान आवास योजना ग्रामीण च्या अपात्र यादीवरून प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. योजनेच्या निकषांनुसार पात्र असलेल्या गरजू नागरिकांना अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून काहींच्या घरांची सर्व्हेक्षणासाठी पाहणीच झाली नसल्याचेही सांगण्यात येत आहे.त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी गुरुवारी भोकरदन पंचायत समितीवर धडक देत गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले.माजी सरपंच राजूभाऊ कुंडलिक खरात यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी पंचायत समितीतील घरकुल विभागात जाऊन संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली.घरकुल योजनेच्या यादीची निष्पक्ष पुनर्तपासणी करून प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करावी आणि खऱ्या गरजू लाभार्थ्यांना न्याय द्यावा अशी जोरदार मागणी करण्यात आली.सर्व्हेच झाला नसेल तर पात्र-अपात्रचा फैसला कशाच्या आधारावर

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार काही नागरिकांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत तर काही लाभार्थ्यांच्या घरांची प्रत्यक्ष पाहणी अथवा सर्व्हेच झाला नसल्याचा आरोप आहे.मग घरबसल्या पात्र-अपात्रचा फैसला नेमका कोणत्या निकषावर करण्यात आला? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.घरकुल योजनेचा लाभ मिळण्याची अपेक्षा असलेल्या गरीब कुटुंबांना यादीतील घोळामुळे पुन्हा घरकुलापासून वंचित राहण्याची वेळ येऊ नये यासाठी कागदपत्रांची पडताळणी प्रत्यक्ष घरांची पाहणी आणि पारदर्शक पुनर्सर्व्हे करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

न्याय द्या अन्यथा उपोषण

प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन सखोल पुनर्तपासणी केली नाही तर ग्रामस्थांसह पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. त्यामुळे लोणगावच्या घरकुल यादीचा प्रश्न आता प्रशासनासाठी चांगलाच डोकेदुखीचा ठरण्याची शक्यता आहे.

गरीबांच्या घराचे स्वप्न कागदावरील चुकीच्या यादीमुळे उद्ध्वस्त होऊ नये, यासाठी प्रशासनाने केवळ कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष गावात उतरून वस्तुस्थिती तपासावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

निवेदनावेळी उपस्थित

माजी सरपंच राजूभाऊ कुंडलिक खरात,ज्येष्ठ नेते कैलास आप्पा,उत्तम पाटील साखरे,कडूबा राजाळे,राजू खांडेभराड, शिवानंद काळे, रायभान बारोकर, कृष्णा घायाळ, दत्ता सरोदे, मनोज साखरे, बंडू धोत्रे, विष्णू बारोकर, पांडुरंग बारोकर, जुनेद कुरेशी, विकास सावंत, नजीर शेख यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

अपात्र यादीतील पात्र लाभार्थ्यांचा दावा

अनिता गोविंदराव बारोकर, लक्ष्मण निंबा बारोकर, गिताबाई शंकर साळवे, हनुमन चतुरा बारोकर, दत्तात्रय प्रभु सरोदे,बाळू राजाराम खोतरे,मनोहर साळवे,सुमन लक्ष्मण वाघ, विठ्ठल भाऊराव खोचे, काशीबाई कोंडिबा बारोकर, सुमन वशिष्ठराम बोडखे, विठ्ठल शंकरराव बोडखे, शिवानंद नारायण काळे, कडूबा संभाजी राठोड, भगवान बळीराम बारोकर, विष्णू बबन कसबे,कैलास गंगाधर कडू,राजू विक्रम खांडेभराड,मुन्ना विठ्ठल भोसले,तुळशीराम कचरू डुकळे,कल्लान गफ्फार कुरेशी,सना सलीम कुरेशी, नसीर निजाम शेख,सुनिता अशोक काळे आदी लाभार्थ्यांनी यादीबाबत आक्षेप नोंदविला आहे.

आता प्रशासन या तक्रारींची किती गांभीर्याने दखल घेते आणि लोणगावच्या घरकुल यादीचा फेरसर्व्हे करून खऱ्या पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळतो का याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



## जामखेड केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात

जामखेड विलास बा.जाधव :- अंबड तालुक्यातील जामखेड केंद्रांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळीवाडी येथे गुरुवारी दि.२७ केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. दुपारी १२ ते सायंकाळी ४ या वेळेत झालेल्या या परिषदेत केंद्रातील मुख्याध्यापक व शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत विविध शैक्षणिक विषयांवर सखोल चर्चा केली. परिषदेत निपुण भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी मागील महिन्यातील शैक्षणिक कामकाजाचा आढावा शैक्षणिक आराखड्यानुसार मासिक नियोजन लोकसहभाग शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेची तयारी विविध स्पर्धा परीक्षा तसेच राज्य व जिल्हास्तरीय शैक्षणिक उपक्रम यावर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता अधिक उंचावण्यासाठी केवळ नियोजन न करता त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर यावेळी विशेष भर देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा सातत्याने आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

केंद्रप्रमुख डॉ. विजय पंजरकर यांनी प्रास्ताविकातून विविध शैक्षणिक बाबींवर मार्गदर्शन केले. केंद्रीय मुख्याध्यापक प्रभाकर भोजने यांनी शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी आवश्यक बाबींवर शिक्षकांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. तज्ज्ञ सुलभक गोविंद राख व दीपक अष्टेकर यांनी परिषदेसाठी निश्चित करण्यात आलेल्या विविध विषयांची कृतीशील व मार्गदर्शक पद्धतीने मांडणी केली.

जामखेड केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांनी परिषदेला शेवटपर्यंत उपस्थित राहून चर्चेत सक्रिय सहभाग नोंदविला. त्यामुळे परिषदेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल गीते यांनी केले तर बोधगिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. परिषद यशस्वी करण्यासाठी माळीवाडी शाळेचे मुख्याध्यापक शालेय व्यवस्थापन समिती उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी विशेष सहकार्य केले.

# शहागडमध्ये पत्रकाराच्या घरावर तलवार-लाठ्यांनी हल्ला पोलिसांपुढे आरोपींच्या अटकेचे आव्हान

## घरासमोर जमाव करून शिवीगाळ मारहाण व दहशत निर्माण केल्याचा आरोप दहा जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा

अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील शहागड येथे पत्रकाराच्या घरावर तलवार लाठ्या-काठ्या आणि दगडांसह हल्ला केल्याच्या गंभीर आरोपाने परिसर हादरला आहे.घरासमोर जमाव जमवून शिवीगाळ आरडाओरड मारहाण आणि दहशत निर्माण केल्याचा आरोप असून या प्रकरणी गोंदी पोलिसांनी तब्बल दहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच शस्त्र अधिनियमातील गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.या घटनेमुळे पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून आरोपी मोकाट का? त्यांना तातडीने बेड्या कधी? असा सवाल उपस्थित होत आहे.

२१ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री साडेसात ते आठ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडल्याचे एफआयआरमध्ये नमूद आहे. रहीम अहेमद शेख वय ६५ रा. शहागड यांच्या फिर्यादीवरून गोंदी पोलीस ठाण्यात एफआयआर क्रमांक ०२५०/२०२६ नोंदविण्यात आला आहे.दहा आरोपींची नावे एफआयआरमध्ये

या प्रकरणात शाकेर शरीफ शेख,सद्दाम मैनौद्दीन शेख, शहेबाज शाकेर शेख,अर्शद शाकेर शेख,जुबेर मुजीब शेख,लुकमान मैनौद्दीन शेख, सुलेमान मैनौद्दीन शेख,मुजीब शरीफ शेख,नियाजोद्दीन जैनोद्दीन शेख आणि मैनौद्दीन जैनोद्दीन शेख अशी दहा जणांची नावे फिर्यादीत नमूद करण्यात आली आहेत.

घरासमोर जमाव तलवार-दगडांचा थरार

फिर्यादीनुसार आरोपी घरासमोर जमून शिवीगाळ व आरडाओरड करीत होते. त्यानंतर फिर्यादी आणि त्यांचा मुलगा अशफाक शेख यांच्यासोबत वाद घालून मारहाण केल्याचा आरोप आहे. तलवा लाठ्या-काठ्यांचा वापर करून हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे तसेच घराच्या परिसरात दगडफेक करून नुकसान केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.



या हल्ल्यात रहीम अहेमद शेख जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे. घटनेनंतर कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण असून शहागड परिसरातही या प्रकाराबाबत संताप व्यक्त होत आहे.गंभीर कलमांचा ससेमिरा आता अटकेकडे नजर गोंदी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०९(१), ११८(२), ११५(२), ३५२, १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३२४(४) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ४ व २५ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.प्रकरणाचा पुढील तपास गोंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण हावले करीत आहेत.पत्रकाराच्या घरावर हल्ला म्हणजे दहशतीला खतपाणी पत्रकाराच्या घरासमोर जमाव करून हत्यारांसह हल्ला केल्याचा आरोप हा केवळ कौटुंबिक अथवा वैयक्तिक वादाचा विषय न मानता कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीरपणे घेण्याची गरज आहे. पत्रकाराला किंवा त्याच्या कुटुंबीयांना धमकावून दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न होत असेल तर अशा प्रवृत्तींना वेळीच लगाम घालणे आवश्यक आहे.

गुन्हा दाखल झाला आता आरोपींच्या अटकेचे काय? असा थेट सवाल उपस्थित होत आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा निष्पक्ष आणि जलद तपास करून सर्व आरोपींचा शोध घ्यावा त्यांना तातडीने अटक करावी आणि कायद्यानुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे.फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक सुरक्षा देण्याबरोबरच या हल्ल्यामागील नेमके कारण हल्ल्याचे नियोजन आणि वापरण्यात आलेली हत्यारे यांचा सखोल तपास होणे गरजेचे आहे. शहागडमध्ये कायद्याचा धाक राहणार की हत्यारांचा? याचे उत्तर आता पोलिसांच्या कारवाईतून मिळणार आहे.

## ३५ वर्षांनंतर शालेय आठवणींना उजाळा

# श्री लक्ष्मणराव जाहेर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न

बीड प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील श्री लक्ष्मणराव जाहेर विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा तब्बल ३५ वर्षांनंतर नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. २६ ऑगस्ट २०२६ रोजी बीड येथील जालना रोडवरील विठ्ठल साई प्रतिष्ठान येथे दुपारी १२ ते ४ या वेळेत हा कार्यक्रम संपन्न झाला. या मेळाव्याच्या निमित्ताने अनेक वर्षांनंतर भेटलेल्या बालपणीच्या मैत्रिणींनी शालेय जीवनातील जुन्या आणि सोनेरी आठवणींना उजाळा दिला.

संसाराच्या व्यापातून स्वतःसाठी एक दिवस

सामाजिक कार्यकर्त्या रुक्मिणी नागापुरे (कळसकर) यांच्या विशेष पुढाकाराने या अनोख्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. लग्नानंतर संसाराच्या व्यापात आणि जबाबदाऱ्यांमध्ये अडकलेल्या महिलांना एक दिवस स्वतःसाठी, स्वतःच्या आनंदासाठी जगता यावा, हा यामागचा प्रमुख उद्देश होता. यासाठी कुमशी, घोसापुरी आणि नामलगाव परिसरातील १९९०-९१ या बॅचच्या (इयत्ता ७ वी, ८ वी आणि ९ वी) माजी विद्यार्थिनींना एकत्र आणण्यात आले.

खेळ, शिदोरी आणि मनमोकळ्या गप्पा

तब्बल साडेतीन दशकांनंतर भेटल्यामुळे सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद ओसंडून वाहत होता. या सर्वजणींनी संपूर्ण दिवस एकमेकींना गजरे लावून, सुख-दुःखाच्या गप्पा मारत आणि मनमोकळेपणाने संवाद साधत (शेअरिंग करून) बालपणातील ते दिवस पुन्हा अनुभवले.



या मेळाव्यातील काही खास क्षण:

पारंपरिक खेळ: या वयातही महिलांनी शाळेच्या मैदानावर खेळले जाणारे खो-खो, आंधळी कोशिंबीर आणि पायदोड यांसारखे पारंपरिक खेळ खेळून मनसोक्त आनंद लुटला.

सहभोजन: प्रत्येकीने घरून आणलेली 'शिदोरी' एकत्र करून सर्वजणींनी एकत्र भोजनाचा आस्वाद घेतला.

रक्षाबंधन व स्नेहभेट: मैत्रिणींनी एकमेकींना राखी बांधून मैत्रीचे हे अतूट नाते अधिक घट्ट केले आणि एकमेकींना स्नेहभेटही दिली.

या आनंददायी आणि भावपूर्ण मेळाव्याला मीरा बांड, शिवकन्या बांड, शारदा शेळके, किस्किनदा बांड, मंगल करपे, कांता शिंदे, उषा जाधव, शालिनी नेरे, दैवशाला डोळस आणि रुक्मिणी नागापुरे आदी माजी विद्यार्थिनींची प्रमुख उपस्थिती होती. ३५ वर्षांनंतरचा हा मेळावा सर्वांसाठीच एक अविस्मरणीय अनुभव ठरला.फ



## रस्ता सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे पालन काळाची गरज

आयएसटीडी संभाजीनगर चॅप्टरतर्फे 'रोड सेफ्टी अवेअरनेस' सत्र

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी

वाढते रस्ते अपघात रोखण्यासाठी प्रत्येक वाहनचालकाने वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करून जबाबदारीने वाहन चालविणे गरजेचे आहे. रस्ता सुरक्षा ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन समृद्धी महामार्गाचे समन्वयक तथा आयएसटीडीचे रिजनल व्हाईस प्रेसिडेंट (वेस्ट) डॉ. सुरेंद्र गेडाम यांनी केले.

इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट (आयएसटीडी), छत्रपती संभाजीनगर चॅप्टरतर्फे डॉ. हेडगेवार रुग्णालयात 'रोड सेफ्टी' विषयावर जनजागृतीपर सत्र घेण्यात आले. यावेळी आरटीओ अधिकारी पूजा वानखेडे, आयएसटीडी छत्रपती संभाजीनगर चॅप्टरचे चेअरपर्सन प्रा. जयप्रकाश बागडे, सेक्रेटरी अशोक गुरनाळे, सखाराम नन्नावरे, हेडगेवार रुग्णालयाचे एचआर हेड रविंद्र कोल्हारकर आणि रविंद्र इंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गेडाम यांनी वेगमर्यादा, हेल्मेट, सीट बेल्ट, सिग्नलचे पालन, वाहन चालविताना मोबाईलचा वापर टाळणे आणि मद्यपान करून वाहन न चालविण्याचे आवाहन केले. पूजा वानखेडे यांनी वाहतूक नियम, वाहनचालकांची कायदेशीर व सामाजिक जबाबदारी आणि अपघात प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

सत्रात सुरक्षित वाहनचालकत्व, वाहतूक शिस्त, आपत्कालीन परिस्थितीतील प्रतिसाद आणि अपघातग्रस्तांना तातडीने मदत यावर चर्चा झाली. उपस्थितांनी प्रश्न व अनुभव मांडल्याने कार्यक्रम संवादात्मक ठरला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र मुकुंद कोल्हारकर यांनी केले, तर रविंद्र इंगे यांनी आभार मानले. आयएसटीडीचे सदस्य व हेडगेवार रुग्णालयाचे कर्मचारी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर दणाणले

## तिरंगा हातात... बेरोजगारांचा एल्गार रस्त्यावर

छ. संभाजीनगर विशेष प्रतिनिधी :-

छत्रपती संभाजीनगरच्या रस्त्यांवर गुरुवारी तिरंग्याची लाट आणि बेरोजगार तरुणांचा आक्रोश पाहायला मिळाला. शेकडो मोटारसायकली... प्रत्येक गाडीवर डौलाने फडकणारा तिरंगा... हातात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे झेंडे आणि वातावरण दणाणून सोडणाऱ्या घोषणा रोजगार आमच्या हक्काचा नाही कुणाच्या बापाचा या घोषणांनी शहर अक्षरशः दणाणून गेले.

राज्यातील वाढत्या बेरोजगारीच्या प्रश्नावर मराठवाड्यातील हजारो तरुण-तरुणींनी रस्त्यावर उतरून बेरोजगार हक्क एल्गार तिरंगा मोटारसायकल मोर्चा काढत सरकारचे लक्ष वेधले. क्रांती चौकातून निघालेला हा मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत थेट विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकला. कार्यालय परिसरात तरुणांचा अक्षरश जनसागर उसळला. मोठ्या संख्येने मोटारसायकली आल्याने वाहतूक व्यवस्थाही काही काळ विस्कळीत झाली.

तिरंगा घेऊन बेरोजगार रस्त्यावर क्रांती चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. हातात तिरंगा आणि पक्षाचे झेंडे घेतलेल्या तरुणांनी नोकऱ्या द्या भरती प्रक्रिया पूर्ण करा रोजगार आमचा अधिकार आहे अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पायऱ्यांवर आणि परिसरात मोठी गर्दी झाली होती.मोर्चाचे नेतृत्व माजी मंत्री आमदार राजेश टोपे आणि बीडचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी केले. भोकरदन-जाफ्राबादचे माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनीही आंदोलनात सक्रिय सहभाग घेत तरुणांच्या प्रश्नाला आवाज दिला.

सरकार फक्त जाहिरातीत व्यस्त राजेश टोपे

माजी मंत्री राजेश टोपे यांनी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. महाराष्ट्रात लाखो तरुण बेरोजगारीच्या संकटाचा




सामना करीत आहेत. सरकार मात्र आकडे आणि जाहिरातींच्या खेळात व्यस्त आहे अशी टीका त्यांनी केली.

एमपीएससी ची जाहिरात निघत नाही जाहिरात निघाली तर परीक्षा वेळेवर होत नाही परीक्षा झाली तर निकाल रखडतो आणि निकाल लागला तरी नियुक्तीचा प्रश्न कायम राहतो. तरुणांच्या आयुष्याशी हा खेळ कशासाठी? असा सवाल टोपे यांनी उपस्थित केला.

सरकारला इशारा देताना ते म्हणाले की रोजगाराचा प्रश्न तातडीने मार्गी लावला नाही तर हा एल्गार केवळ एका शहरापुरता मर्यादित राहणार नाही प्रत्येक जिल्ह्यात आणि तालुक्यात आंदोलनाची ठिणगी पोहोचेल.

मराठवाड्याचा तरुण १२ हजारांसाठी पुणे-मुंबईत राबतोय

खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांनी बेरोजगार तरुणांच्या व्यथा मांडत सरकारला जाब विचारला.

पदवी हातात असूनही मराठवाड्यातील तरुण पुणे-मुंबईत १०-१२ हजार रुपयांच्या नोकरीसाठी १२-१२ तास राबतोय. ही परिस्थिती केवळ बेरोजगारीची नाही तर मराठवाड्याच्या तरुणांच्या स्वाभिमानाची शोकांतिका आहे असे सोनवणे म्हणाले.

आजचा तिरंगा मोर्चा हा तरुणांच्या स्वाभिमानाचा लढा आहे. रोजगार हा तरुणांचा हक्क आहे. हा लढा छत्रपती संभाजीनगरपुरता थांबणार नाही. गरज पडली तर हा एल्गार मुंबईहून थेट दिल्लीपर्यंत नेऊ असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

हाताला काम द्या पोकळ आश्वासने नको

माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनीही सरकारला धारेवर धरले.भोकरदन-जाफ्राबादच्या तरुणांचा एकच सवाल आहे पोकळ आश्वासने नकोत हाताला काम द्या असे त्यांनी सांगितले.हा केवळ मोर्चा नाही. गेल्या काही वर्षांत वाढलेल्या बेरोजगारीविरोधात तरुणांच्या मनात साचलेल्या संतापाचा हा उद्रेक आहे. आम्ही आज शांततेच्या मार्गाने इशारा दिला आहे. सरकारने तरुणांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा दानवे यांनी दिला.

आयुक्तांना निवेदन चार प्रमुख मागण्या विभागीय आयुक्तांना दिलेल्या निवेदनातून बेरोजगार तरुणांच्या विविध मागण्या मांडण्यात आल्या. त्यामध्ये एमपीएससी, पोलीस, आरोग्य, शिक्षक आदी रखडलेल्या भरती प्रक्रिया तातडीने आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण कराव्यात.मराठवाड्यात विशेष रोजगार मेळावे आणि कौशल्य विकास केंद्रे सुरू करावीत.सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी बेरोजगारी भत्ता सुरू करावा.खासगी क्षेत्रात स्थानिक तरुणांना ८० टक्के रोजगार देण्याबाबत प्रभावी अंमलबजावणी करावी.

रोजगार मिळेपर्यंत एल्गार थांबणार नाही

या मोर्चामुळे छत्रपती संभाजीनगरात बेरोजगारीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला. तिरंगा हातात घेऊन रस्त्यावर उतरलेला तरुण घोषणांनी दणाणलेले शहर आणि विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उसळलेला जनसागर यामुळे सरकारपुढे बेरोजगारीच्या प्रश्नाचे गांभीर्य अधोरेखित झाले.

मोर्चाच्या शेवटी आयोजकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला तरुणांच्या हक्कासाठी संघर्ष सुरूच राहणार. रोजगार मिळाल्याशिवाय हा एल्गार थांबणार नाही

या आंदोलनात छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पांडुरंग पाटील तांगडे, जालना जिल्हाध्यक्ष ड. संजय काळबांडे, युवानेते सुधाकर अण्णा दानवे, प्रदेश सरचिटणीस पंकज नाना बोराडे, किसान सेलचे प्रदेशाध्यक्ष जगन्नाथ काकडे, विद्यार्थी सेलचे प्रदेशाध्यक्ष सुशील बोर्डे, बदनापूर तालुकाध्यक्ष राम शिरसाट यांच्यासह मराठवाड्यातील पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या आणि बेरोजगार तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# भाग २ | महिला जगत

## कॅन्सरपासून बचावासाठी महिलांनी स्वत:साठी वेळ द्या.!

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

जागरूकता, नियमित तपासणी आणि निरोगी जीवनशैली हाच सुरक्षिततेचा मार्ग आजच्या धावपळीच्या जीवनात महिला कुटुंबाची जबाबदारी सांभाळताना स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. विशेषत: स्तनाच्या कर्करोगाबाबत जागरूकता, वेळेवर तपासणी आणि योग्य वैद्यकीय सल्ला अत्यंत महत्त्वाचा आहे. स्तनाचा कर्करोग महिलांमधील सर्वाधिक आढळणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे आणि लवकर निदान झाल्यास उपचार अधिक परिणामकारक ठरतात.

महिलांनी कोणती काळजी घ्यावी.?

१) नियमित तपासणी करा :

वय, कौटुंबिक इतिहास आणि वैयक्तिक जोखमीनुसार डॉक्टरांच्या सल्ल्याने मॅमोग्राफी व आवश्यक तपासण्या करून घ्याव्यात. स्तनात गाठ, आकारातील बदल, त्वचेवर असामान्य बदल किंवा निप्पलमध्ये बदल जाणवल्यास विलंब न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

२) स्वत:च्या शरीरातील बदल ओळखा :

दर महिन्याला स्तनांमध्ये काही असामान्य बदल जाणवतो का, याकडे लक्ष द्या. मात्र स्वत:ची तपासणी ही वैद्यकीय तपासणीचा पर्याय नाही. कोणताही संशयास्पद बदल आढळल्यास तज्ज्ञांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

३) नियमित व्यायाम करा :

दररोज चालणे, योग, प्राणायाम किंवा आपल्या क्षमतेनुसार व्यायाम करण्याची सवय लावा. नियमित शारीरिक हालचाल आणि निरोगी वजनामुळे स्तनाच्या कर्करोगासह अनेक आजारांचा धोका कमी करण्यास




मदत होते.

४) वजन नियंत्रणात ठेवा :

लठ्ठपणा आणि निष्क्रिय जीवनशैली अनेक कर्करोगांच्या जोखमीशी संबंधित आहेत. पौष्टिक आहार, नियमित हालचाल आणि वजनावर नियंत्रण ठेवणे महत्त्वाचे आहे. ५) हार्मोनल औषधे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच घ्या :हार्मोनल उपचार किंवा गर्भनिरोधक साधनांचा दीर्घकाळ वापर करण्यापूर्वी डॉक्टरांशी चर्चा करणे आवश्यक आहे. काही हार्मोनल उपचारांमुळे स्तनाच्या कर्करोगाचा धोका वाढू शकतो.

६) ताणतणाव कमी करा :

योग, ध्यान, प्राणायाम, छंद आणि सकारात्मक विचार यामुळे मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यास मदत होते. सुदर्शन क्रिया किंवा कोणतीही ध्यानपद्धती करायची असल्यास ती प्रशिक्षित व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली करावी. मात्र केवळ ताण कमी केल्याने कॅन्सर टाळता येतो किंवा बरा होतो, असा दावा वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेला नाही.

७) स्तनपानाला प्राधान्य द्या :

बाळाला स्तनपान देणे आई आणि बाळ दोघांसाठीही फायदेशीर आहे. दीर्घकाळ स्तनपान केल्याने स्तनाच्या कर्करोगाचा धोका काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

८) पुरेशी झोप आणि आरोग्यदायी दिनचर्या :

नियमित आणि शांत झोप, संतुलित आहार, व्यायाम आणि तंबाखू-दारूपासून दूर राहणे हे कर्करोग प्रतिबंधासाठी महत्त्वाचे घटक आहेत.

९) चुकीच्या समजुतींपासून सावध रहा :

ब्रा किंवा पॅन्टी वापरणे, रात्री ब्रा घालणे किंवा मोबाईलचे रेडिएशन हे स्तनाच्या कर्करोगाचे सिद्ध कारण आहे, असे ठोस वैज्ञानिक पुरावे नाहीत. त्यामुळे अशा संदेशांवर विश्वास ठेवण्यापेक्षा वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

एक छोटीशी जाणीव...

कॅन्सरपासून १०० टक्के बचावाची हमी कोणतीही पद्धत देऊ शकत नाही. मात्र निरोगी जीवनशैली, जोखीम घटकांपासून दूर राहणे, शरीरातील बदलांकडे दुर्लक्ष न करणे आणि योग्य वेळी वैद्यकीय तपासणी करणे यामुळे कर्करोगाचा धोका कमी करण्यास आणि तो लवकर ओळखण्यास मदत होते.

महिलांनी इतरांसाठी जगताना स्वत:च्या आरोग्यासाठीही वेळ द्यावा-कारण निरोगी महिला म्हणजे निरोगी कुटुंब आणि सक्षम समाज!

=/ लेखिका :

सौ. अर्चना स्वामी, अंबाजोगाई

(कॅन्सरच्या अनुभवातून कॅन्सर जनजागृती व मार्गदर्शनासाठी सक्रिय.)

# आरक्षणाच्या हक्कासाठी ओबीसींचा एल्गार

## १ सप्टेंबरला मुंबईत लाखोंनी धडक द्या!

### बोधेगावात लक्ष्मण हाकेंचा सरकारवर घणाघात

अहिल्यानगर (प्रशांत बाफना)

ओबीसी आरक्षणाच्या हक्काला धक्का देण्याचा कोणताही प्रयत्न सहन केला जाणार नाही. मतभेद, पक्षीय राजकारण व स्वार्थ बाजूला ठेवून ओबीसींनी एकसंघ व्हावे. १ सप्टेंबरला मुंबईत होणाऱ्या यलगार मेळाव्यात लाखोंच्या संख्येने सहभागी होऊन ओबीसींची ताकद दाखवा, असे आवाहन ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी केले.

बोधेगाव येथील वामनभाऊनगर येथे झालेल्या ओबीसी मेळाव्यात ते बोलत होते. ओबीसी आरक्षण हा संविधानिक हक्क असून तो हिरावून घेण्याचा प्रयत्न झाल्यास संघर्ष तीव्र करण्याचा इशारा त्यांनी दिला. ओबीसींच्या मतांवर सत्ता मिळविणारे राज्यकर्ते आरक्षणाच्या प्रश्नावर मौन का ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

आरक्षणासाठी बोगस प्रमाणपत्रांचा वापर होत असल्याचा आरोप करून पात्र ओबीसी युवकांच्या शिक्षण व रोजगाराच्या संधींवर अन्याय होत असल्याचे हाके म्हणाले. बोगस प्रमाणपत्रांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

आरक्षण वाचवायचे असेल तर घरात बसून चालणार नाही. १ सप्टेंबरला मुंबईत उतरावे लागेल, असे सांगत त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. पुणे जिल्ह्यातील पाटस येथून ओबीसी समाजबांधव रथासह मुंबईकडे रवाना होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सत्तेच्या राजकारणावर टीका करताना सहकारी संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या व शैक्षणिक संस्थांमध्ये ओबीसींना अपेक्षित प्रतिनिधित्व मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला. मतदानाची ताकद ओळखून आपल्या घटनात्मक हक्कासाठी ठाम भूमिका घेणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी बळीराम खटके व रामजी अंधारे यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन बाजीराव लेंडाळ, तर आभार रामनाथ खेडकर यांनी मानले.

मेळाव्यास बजरंग सानप, बालाजी बारगजे, कोळेकर सुनील, ढाकणे उबाळे, भागवत शिंगाडे, शिवाजी खेडकर, केशव खेडकर, लक्ष्मण आघाव, मारुती आघाव, अंकुश खेडकर, भीमराज बनसोडे, माणिक गर्जे, भास्कर मासाळकर, संदीप हुगे, गुलाबराव गव्हाणे, मोहन रामनाथ थोरे, बाळासाहेब ढाकणे, गोरख खेडकर, मारुती अभंग, त्रिंबकराव कंठाळे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मुंडे असते तर पवारांना सोबत घेऊन आरक्षणाचा तोडगा काढला असता..

लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेब आज असते तर त्यांनी पक्षीय राजकारण बाजूला ठेवून ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्यासह सर्वपक्षीय नेत्यांना एका व्यासपीठावर आणून ओबीसी आरक्षणाचा प्रश्न घटनात्मक मार्गाने सोडविण्यासाठी निर्णायक भूमिका घेतली असती, अशी भावना मेळाव्यात व्यक्त करण्यात आली.

पक्षापेक्षा समाज आणि राजकारणापेक्षा आरक्षणाचा हक्क मोठा आहे. त्यामुळे सर्व नेत्यांनी एकत्र बसून विविध समाजांच्या आरक्षणाच्या मागण्यांवर घटनात्मक तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली. मुंडे असते तर आरोप-प्रत्यारोपांत वेळ न घालवता पवारांसह सर्व नेत्यांना सोबत घेऊन आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संघर्ष केला असता, अशी भूमिका प्रा. लक्ष्मण हाके यांनी मांडली.

# कमी पावसाने ऊस उत्पादक शेतकरी होरपळला

# हेक्टरी ५० हजारांची मदत द्या

## पायरिल्या,पिठ्या ढेकूण, ऊमणीच्या प्रादुर्भावाने उत्पादन घटले -मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके पाटील यांचा सरकारला इशारा

परतूर पिराजी गायकवाड

जालना जिल्ह्यासह मराठवाड्यात यंदा पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचा सर्वाधिक फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसत असून कमी पाऊस पाण्याचा ताण आणि पिकांवरील वाढता किडी-रोगांचा प्रादुर्भाव यामुळे ऊस उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. एकीकडे उत्पादन घटत असताना दुसरीकडे उत्पादन खर्चाचा वाढता बोजा शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. त्यामुळे शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये विशेष आर्थिक मदत द्यावी अशी आक्रमक मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके पाटील यांनी केली आहे.कमी पावसामुळे ऊस पिकाला आवश्यक प्रमाणात पाणी मिळत नसतानाच पायरिल्या पिठ्या ढेकूण आणि ऊमणी यांसारख्या किडी व रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे ऊस पिकाच्या वाढीवर गंभीर परिणाम होत असून उत्पादनात लक्षणीय घट होत असल्याचे सोळंके यांनी निवेदनातून निदर्शनास आणून दिले आहे.



विशेषत ८०००५, १५००१२, १००००१ आणि २६५ या ऊस जातींवर कमी पाऊस आणि किडी-रोगांचा मोठा परिणाम झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. पाण्याचा ताण कमी पर्जन्यमान आणि किडींचा वाढता प्रादुर्भाव यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर थेट परिणाम होत आहे. परिणामी खर्च वाढत असताना उत्पन्न घटण्याची वेळ ऊस उत्पादकांवर आली आहे.सरकारने केवळ पंचनाम्यांच्या फेऱ्यात शेतकऱ्यांना अडकवू नये

दुष्काळसदृश परिस्थितीचे केवळ कागदी अहवाल तयार करून उपयोग नाही. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष आर्थिक मदत पोहोचली पाहिजे अशी भूमिका सोळंके यांनी मांडली आहे. शासनाने तातडीने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे अशी मागणी त्यांनी केली.यासंदर्भातील निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजीराव शिंदे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील,साखर आयुक्त पुणे, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग आणि जिल्हाधिकारी जालना यांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहे.ऊस उत्पादक वाचला तरच साखर उद्योग टिकेल

ऊस उत्पादक शेतकरी हा साखर उद्योगाचा कणा आहे. शेतकरीच आर्थिक संकटात सापडला तर साखर कारखाने, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि त्यावर अवलंबून असलेली हजारो कुटुंबे अडचणीत येतील. त्यामुळे सरकारने ऊस उत्पादकांच्या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे सोळंके यांनी स्पष्ट केले.दरम्यान साखरेच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिकांवरही आर्थिक बोजा वाढत असल्याने साखरेच्या दराबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन जनतेला दिलासा द्यावा अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.कमी पाऊस दुष्काळसदृश परिस्थिती वाढलेला उत्पादन खर्च किडी-रोगांचा प्रादुर्भाव आणि घटणारे उत्पादन या सर्व संकटांचा एकत्रित विचार करून शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा; अन्यथा ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा रोष वाढू शकतो असा इशाराही प्रकाश सोळंके पाटील यांनी दिला आहे.

## शिवसेना ओबीसी राज्य संपर्क प्रमुख तथा पत्रकार अनिल पाटील धमने यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने


# परिसरातील विविध शाळेतील विद्यार्थी यांना शालेय साहित्य वाटप व वृक्षारोपन



नांदेड :- शिवसेना ओबीसी बारा बलुतेदार विभागाचे राज्य संपर्क प्रमुख पत्रकार अनिल पाटील धमने यांनी वाढदिवसाच्या निमित्त सामाजीक बांधीलकी जोपासत हडको वाघाळा येथिल संतोष कन्या प्राथमिक शाळा व तर गोपाळचावडी येथील जिल्हा परिषद शाळा ,लहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकाश्रम साईबाबा नगर वाडी पाटी तालुका नांदेड येथिल निराधार निराश्रीत विष्णुपुरी येथिल ग्रामिण दिव्यांग मुकबधीर विद्यालय येथे सिडको वृत्त पत्र विक्रेते यांच्या पाल्यांना शैक्षणिक प्राथमिक शाळा व ग्रामिण दिव्यांग मुकबधीर विद्यालय व लहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकाश्रम येथे शालेय साहित्य व वृक्षारोपन फळे वाटप व सामाजीक बांधीलकी जोपासत विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा केला.

सामाजीक बांधीलकी जोपासत शिवसेना ओबीसी राज्य संपर्क प्रमुख पत्रकार अनिल पाटील धमने यांनी दर वर्षा प्रमाणे याही वर्षी एक चांगला आगळा वेगळा अभिनव उपक्रम राबवुन पैसे इतरत्र खर्चा न करता एका सामाजीक हीताच्या कामात खर्चा करावा हे हेतू डोळ्या समोर ठेऊन जवळपास तिनशे ते चारशे विद्यार्थी यांना शालेय उपयोगी शालेय साहीत्य वाटप करून साध्या पध्दतीने आपल्या वाढदीवसा निमित्त दि २४ ऑगस्ट रोजी साध्या पद्धतीने साजरा केला.

यावेळी प्रमूख उपस्थिती व्हॉईस आफ मीडीयाचे मराठवाडा अध्यक्ष डॉ गणेश जोशी ,भाजपाचे युवा नेते नगरसेवक संजय पाटील घोगरे . महिला बाल कल्याण समिती उप सभापती प्रतिनीधी राजू लांडगे, नगरसेवक वैजनाथ देशमुख, नगरसेवक प्रतिनीधी सतिष बस्वदे, गोपाळचावडी ग्रा प चे उप सरपंच साहेबराव पाटील सेलुकर,छावा संघटनेचे भास्कर हंबर्डे संजय सोनकांबळे ,गणेश जिंदम ,विनोद जोंधळे,विजय पांचाळ,विजय ठाकुर ,आनंदा वाघमारे,बालाजी आचमे,चंद्रकांत म्यानेटवराजू कऱ्हाळे ,बालकाश्रमाच्ये व्यवस्थापक व कर्मचारी उपस्थित होते.यांच्या सह अनेकांच्या उपस्थितीत शिवसेने ओबीसी राज्य संपर्क प्रमुख पत्रकार अनिल पाटील धमने , यांचा वाढदीवस दि २४ ऑगष्ट असा दोन दिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला, यावेळी संतोष कन्या प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश ढगे, संजिव सिद्धापूरे, ईश्वर धुळगंडे ,आश्विनी आवळे ,वर्षा देशमुख यांच्या सह गोपाळचावडी जिल्हा परिषद शाळे च्या शिक्षक उपस्थित होते . यांच्या सह आदिनी परिश्रम घेतला अनेकांनी वाढदीवसाच्या शुभेच्छा सह हा अनोखा अगळा वेगळा अभिनव उपक्रम राबवील्या बद्दल शासकीय,राजकीय , सामाजीक, शैक्षणिक पत्रकार ,क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तर संदेश पत्राद्वारे शिवसेनेचे मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुभेच्छा पत्रा व्दारे दिल्या.



सत्यमेव जयते
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

प्रति,
श्री. अनिल मारोतीराव धमणे पाटील
शिवसेना ओबीसी राज्य संपर्कप्रमुख, नांदेड

चक्करबर्डी, धुळे

**वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा !**

वाढदिवस म्हणजे एक नवी सुरुवात. आपल्या सर्व जिवलगांना एकमेकांशी घट्ट बांधणारा हा दिवस. आयुष्यातील आजवर मिळवलेले यश, क्षण आणि साथ याबद्दल कृतार्थता आणि खुणावणारे भविष्य अशा संमिश्र भावना या दिवशी मनात असतात.

आपल्या कर्तृत्व आणि बुद्धिमत्तेच्या बळावर समाजकार्य घडावे आणि राष्ट्र हितासाठी आपले भरीव योगदान लाभावे. आपली साथ माझ्यासाठी नेहमीच आश्वासक आहे. पुढील काळही असाच आनंद, यश आणि आकांक्षांच्या पूर्ततेचा असो, या मनःपूर्वक सदिच्छा.

|| जीवेत् शरदः शतम् ||

एकनाथ संभाजी शिंदे
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

कार्यालय : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दूरध्वनी : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in

# तालुकास्तरीय इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत निदा शेख व गौरी चव्हाण प्रथम

## रोहिलागड बीटचे नाव जिल्हास्तरीय अंतिम फेरीत उज्ज्वल केंद्रप्रमुख श्रीमंतराव गंगावणे यांच्या हस्ते सत्कार

रोहिलागड प्रतिनिधी :-

जालना जिल्हा इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत रोहिलागड बीटच्या विद्यार्थिनींनी दमदार कामगिरी करत यशाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता ९ वी ते १० वी तसेच ६ वी ते ८ वी या गटात कु. निदा सत्तार शेख आणि कु. गौरी चव्हाण यांनी तालुकास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत जिल्हास्तरीय अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे.

अंबड येथील मत्स्योदरी महाविद्यालयाच्या प्रांगणात तालुकास्तरीय स्पर्धेचा चौथा टप्पा पार पडला. अंबड तालुक्यातील विविध बीटमधून प्रथम क्रमांक मिळविलेल्या जिल्हा परिषद तसेच खासगी व्यवस्थापनाच्या विविध माध्यमांच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. यामध्ये निदा शेख हिने विद्यार्थ्यावर सोशल मीडियाचा प्रभाव तर गौरी चव्हाण हिने माझा देश माझी जबाबदारी या विषयावर



प्रभावीपणे इंग्रजी भाषेत आपले विचार मांडत परीक्षकांची मने जिंकली आणि प्रथम क्रमांक मिळविला.

या उल्लेखनीय यशाबद्दल रोहिलागड बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी तथा केंद्रप्रमुख आणि राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त श्रीमंतराव गंगावणे यांच्या हस्ते निदा शेख व गौरी चव्हाण यांचा सत्कार करण्यात आला.

या विद्यार्थिनींना शिक्षिका सुषमा बागुल, शिक्षक सोनवणे, तसेच जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक श्री. चव्हाण व शिक्षिका श्रीमती गौर्डे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.आता या स्पर्धेचा पाचवा आणि अंतिम जिल्हास्तरीय टप्पा जालना येथे पार पडणार असून त्यासाठी निदा व गौरी सज्ज झाल्या आहेत. त्यांच्या यशाबद्दल मुख्याध्यापक नलावडे, दाभाडे, गंगावणे, नामदेव गाडगे, चंदनशिव, नाथा टकले, राधा किसन चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन करून जिल्हास्तरीय अंतिम फेरीसाठी शुभेच्छा दिल्या.

निदा शेख आणि गौरी चव्हाण यांच्या या यशामुळे रोहिलागड बीटच्या शैक्षणिक गुणवत्तेला पुन्हा एकदा झळाळी मिळाली असून परिसरातून दोन्ही विद्यार्थिनींचे कौतुक होत आहे.

# जय भवानी चौक ते तांबवा गावापर्यंतचा रस्ता बनला मृत्यूचा सापळा

केज/प्रतिनिधी

केज शहरातील जय भवानी चौक ते तांबवा या मार्गावरून जाणाऱ्या पंढरपूर- खामगाव राष्ट्रीय महा मार्गावर दिवसेंदिवस वाहतुकीची वर्दळ वाढत असून,भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका निर्माण झाला आहे.या मार्गावर गतिरोधक बसवून वाहनांच्या वेगावर नियंत्रण आणावे,अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.या मार्गा लगत स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल,साने गुरुजी निवासी विद्यालय, विविध क्लासेस,संत भगवान बाबा वस्तीगृह यांसह इतर शैक्षणिक संस्था आहेत.त्यामुळे या रस्त्यावरून दररोज मोठ्या संख्येने विद्यार्थी -विद्यार्थिनी तसेच शिक्षक,पालक आणि नागरिकांची ये-जा असते.

महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवजड व हलकी वाहने धावत असतात.अनेक वाहन चालक वेग मर्यादेचे पालन न करता सुसाट वाहन चालवत असल्याने या परिसरात वारंवार



छोटे-मोठे अपघात घडत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.विशेषतः शाळा व वसतिगृह परिसरात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.विद्यार्थ्यांचीआणि सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच एमएसआरडीसी ने संयुक्तपणे या ठिकाणाची पाहणी करून नियमानुसार आवश्यक ठिकाणी गतिरोधक,वेगमर्यादा फलक आणि इतर सुरक्षितता उपाय योजना तातडीने कराव्यात,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.अपघात झाल्यानंतर उपाय योजना करण्यापेक्षा अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने वेळीच प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात, अशी मागणी करण्यात येत आहे.

## शिवसेना महिला जिल्हाप्रमुख डॉ.सौ. प्रतिभाताई थोरात यांनी

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ येथे केले विद्यार्थ्यांना दप्तराचे वाटप

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील कुंबेफळ जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेतील पहिली ते इ. सातवीच्या विद्यार्थ्यांना डॉ.अशोक दादा थोरात संचालक,महाराष्ट्र राज्य आरोग्य विमा सोसायटी मुंबई यांच्या सुविद्य पत्नी शिवसेना

जिल्हाप्रमुख केज, परळी विधानसभा मतदार संघ यांनी शालेय दफ्तर वाटप केले.श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.कार्यक्रमाचे सुत्र संचलन या शाळेतील प्राथमिक पदवीधर डॉ रामकिशन ग्यानबा मुळे सर यांनी केले. प्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास शिक्षण प्रेमी प्रकाश तुकाराम थोरात,सरपंच अविनाश पांचाळ, विष्णु आबा थोरात, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. शालु विजय थोरात, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, सेवानिवृत्त शिक्षक श्री. जीवन बापुराव थोरात गुरुजी,सेवा सहकारी सोसायटीचे विद्यमान चेअरमन सुनिल बालासाहेब थोरात, सेवानिवृत्त शिक्षक श्री.



उध्दव थोरात,बळीराम थोरात,श्री.ह.भ.प. विष्णु महाराज थोरात, ग्राम पंचायत सदस्य अशोक थोरात व जानुमियाँ शेख, धोंडीराम थोरात, पांडुरंग थोरात चाच्या, गौतम थोरात,व्यंकटी थोरात,श्रीपती ढोरे, नरसिंग थोरात,सुग्रीव थोरात,आकाश थोरात, बळीराम पांचाळ, आबेद शेख,संदीप थोरात,नंदकिशोर थोरात,गणेश थोरात तसेच या शाळेतील शिक्षक श्री.आकाश दत्तात्रय लोंढे,राहुल बजरंग बचुटे, आबासाहेब तुळशिराम धपाटे,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम, अंगणवाडी ताई उषाताई व गावातील अनेक गावकरी,शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते.यावेळी प्रकाश बंडु आबा थोरात यांनी शाळेला १० खुर्च्या, सेवा सहकारी सोसायटीचे विद्यमान चेअरमन सुनिल बालासाहेब थोरात यांनी साउंड सिस्टीम भेट दिली.अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.शेवटी राहुल बजरंग बचुटे सर यांनी आभार मानले.



# आनंद दिघे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आमदार बाबुराव कोळेकर यांची हिमायतनगरला भेट

हिमायतनगर : धर्मवीर आनंद दिघे यांच्या स्मृतिदिनानिमित्त माननीय आमदार बाबुराव कोळेकर साहेब यांनी हिमायतनगर शहराला भेट दिली. यावेळी आनंद दिघे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक कार्याची आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेल्या योगदानाची आठवण यावेळी उपस्थितांनी जागवली.

या भेटीदरम्यान हिमायतनगर शहरातील विविध विकासकामांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, नाली व्यवस्था, पथदिवे तसेच नागरिकांच्या दैनंदिन समस्या यांचा आढावा घेण्यात आला.हिमायतनगरच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्य देऊन त्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याची भूमिका आमदार बाबुराव कोळेकर साहेब यांनी व्यक्त केली. नागरिकांच्या समस्या जाणून घेत त्या सोडविण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करण्याची गरज असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.विकासकामांना गती देण्याचा निर्धारहिमायतनगर शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणे, प्रलंबित कामे मार्गी लावणे आणि नवीन विकासकामांना चालना देण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. शहराचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्यासाठी आगामी काळातही सातत्याने पाठपुरावा केला जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.आनंद दिघे यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेली ही भेट केवळ अभिवादनापुरती मर्यादित न राहता हिमायतनगरच्या विकासाला दिशा देणारी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# सुरज भैया घुले यांची भारतीय जनता युवा मोर्चाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड

## येवता सर्कलमध्ये उत्साहाचे वातावरण

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील टाकळी गावाचे भुमिपुत्र भारतीय जनता पक्षाच्या युवा संघटनेत सक्रियपणे कार्यरत असलेले युवा नेते सुरज भैया घुले यांची भारतीय जनता युवा मोर्चा (इगधच्) च्या बीड जिल्हा कार्यकारिणीच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे येवता सर्कलसह परिसरातील युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे साहेब यांच्या नेतृत्वाखाली, मा.खासदार डॉ.प्रीतम ताई मुंडे व आ.नमिता मुंदडा यांच्यामार्गदर्शना खाली,अंबाजोगाई चे

नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा काकाजी व अक्षय भैया मुंदडा यांच्या सूचनेनुसार तसेच जिल्हाध्यक्ष संजयभाऊ आंधळे यांच्या अध्यक्षतेखाली सुरज भैया घुले यांच्या वर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.सुरज भैया घुले हे युवकांच्या विविध सामाजिक,शैक्षणिक,




क्रीडा तसेच सार्वजनिक उपक्रमात सातत्याने सक्रिय राहिले आहेत.युवकांना संघटित करून सामाजिक कार्यात सहभागी करून घेण्या सोबतच विविध उपक्रमांच्या माध्यमा तून त्यांनी आपली स्वतंत्र कार्यशैली निर्माण केली आहे.

भारतीय जनता युवा मोर्चाच्या बीड जिल्हा उपाध्यक्षपदी झालेली ही निवड त्यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल मानली जात असून,या माध्यमातून बीड जिल्ह्यातील युवकांना संघटित करण्यासाठी तसेच पक्षाच्या संघटनात्मक कार्याला अधिक बळकटी देण्यासाठी त्यांना मोठी जबाबदारी मिळाली आहे.सुरज भैया घुले यांच्या निवडीचे वृत्त समोर येताच येवता सर्कल मधील कार्यकर्ते, पदाधिकारी,मित्र परिवार व विविध क्षेत्रातील मान्यवरां कडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे तसेच त्यांच्या पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.सुरज भैया घुले यांना मिळालेल्या या नव्या जबाबदारीतून युवकांच्या प्रश्नांना वाचा फोडत संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे पुढे नेतील,असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

सुरज भैया घुले यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असुन त्यांना भावी सामाजिक,राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



# 'पोलीस आपल्या बांधावर'चा दणका पाडळीतील १० वर्षांचा शेतीचा वाद मिटला.!

शिरूर कासार प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलाच्या 'पोलीस आपल्या बांधावर' या उपक्रमातून पाडळी, ता. शिरूर कासार येथील मागील ८ ते १० वर्षांपासून सुरू असलेल्या कौटुंबिक व शेतीच्या वादावर सामोपचाराने तोडगा काढण्यात आला. संबंधित सासऱ्यांनी आपल्या नातवाच्या नावे अडीच एकर जमीन देण्याचे मान्य केल्याने वादाला कायमस्वरूपी पूर्णविराम मिळाला.

पतीच्या निधनानंतर शेतीच्या हक्कासह स्वतः व मुलाच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नावरून संबंधित महिलेचा सासऱ्याशी वाद सुरू होता. शेतीत प्रवेश करू न देणे, मारहाण तसेच उदरनिर्वाहासाठी शेती उपलब्ध करून न देण्याबाबत तिने यापूर्वी पोलीस ठाण्यात तक्रारी केल्या होत्या.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी केवळ तक्रारीपुरती कारवाई न करता प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतले. गावातील प्रतिष्ठित नागरिक व नातेवाईकांच्या उपस्थितीत संवाद साधत सामोपचाराने तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. त्याला यश येऊन सासऱ्यांनी नातवाच्या नावे अडीच एकर जमीन देण्याचे मान्य केले.

या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून सुरू असलेला वाद मिटला असून, भविष्यातील तणाव व संभाव्य कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न टळला आहे.'पोलीस आपल्या बांधावर' हा उपक्रम शेतजमीन, बांध, पाणी व शेतरस्त्यांच्या वादांवर कायदेशीर मार्गदर्शन आणि सामोपचारातून तोडगा काढण्यासाठी राबविण्यात येत आहे. वाद वाढण्यापूर्वी नागरिकांनी जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन बीड जिल्हा पोलीस दलाने केले आहे.



# जनगणना कर्मचाऱ्यांचे मानधन रखडले; संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी

केज/प्रतिनिधी

राष्ट्रीय जनगणनेच्या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणक व पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांचे मानधन अद्याप मिळाले नसल्याने संबंधित कर्मचारी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील इतर नगरपालिका व तहसील कार्यालया मध्ये मानधन वाटप करण्यात आले असून, केवळ केज तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे मानधन अद्याप प्रलंबित असल्याचे सांगण्यात येत आहे.जनगणनेचे कामकाज करण्या साठी दिलेल्या अनेक नियुक्ती आदेशांमधील नावे वगळणे अथवा आदेश रद्द करण्याच्या प्रक्रियेवरून यापूर्वी तहसील कार्यालयाची मोठ्या प्रमाणात बदनामी झाल्याची चर्चा होती.आता पुन्हा जनगणना विभागातील प्रशासकीय प्रक्रियेला विलंब होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जनगणनेचे राष्ट्रीय महत्त्वाचे काम जबाबदारीने पूर्ण करणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांना त्यांचे मानधन वेळेत मिळणे अपेक्षित आहे. मात्र,संबंधित कागदपत्रे व आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्याने मानधन रखडल्याचा आरोप करण्यात येत आहे.

या प्रकरणी जनगणना विभागाचे संबंधित लिपिक शुभम राऊत यांच्या कामकाजा बाबत कर्मचारी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त होत असून, त्यांच्या कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी,अशी मागणी होत आहे. नव्याने नियुक्त झालेले तहसीलदार यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन प्रलंबित मानधनाची प्रक्रिया पूर्ण करावी तसेच संबंधित कर्मचाऱ्याची चौकशी करून दोष आढळल्यास नियमा नुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.कर्मचाऱ्या कडून शुभम राऊत यांची तात्काळ हकालपट्टी करण्याची ही मागणी करण्यात येत आहे.दरम्यान, कर्मचाऱ्यांचे मानधन नेमक्या कोणत्या कारणामुळे रखडले आहे,याबाबत तहसील कार्यालयाची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.त्यामुळे संबंधित प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करून प्रलंबित मानधनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राजारामपुरी पोलिसांची गणेश मंडळांसोबत बैठक, कायदा-सुव्यवस्थेबाबत कडक सूचना

कोल्हापूर प्रतिनिधी

आगामी गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, तसेच गणेश मंडळांकडून कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी राजारामपुरी पोलिसांनी बुधवारी दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक घेतली.

सायंकाळी ५ ते ६.३० वाजेपर्यंत राजारामपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राजेंद्रनगर, साळुंखे पार्क, सुभाषनगर, जवाहरनगर, सरनाईक वसाहत आणि नेहरूनगर परिसरातील गणेश मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. गणेशोत्सवाच्या कालावधीत मंडळांनी



प्रशासनाच्या नियमांचे पालन करून उत्सव शांततेत पार पाडावा, याबाबत पोलिसांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा येणार नाही, नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही तसेच कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडणार नाही, यासाठी मंडळांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या. उत्सवाच्या आयोजनात पोलीस प्रशासन, महापालिका आणि वीज विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहनही करण्यात आले.

या बैठकीस श्रीमती प्रिया पाटील मॅडम पोलीस निरीक्षक विकास जाधव (शाखा अभियंता, कोमनपा), श्री. दिलीप पाटणकर (आरोग्य निरीक्षक, कोमनपा), श्री. शुभम गुरव (सहायक अभियंता, एमएसईबी) यांच्यासह परिसरातील ज्येष्ठ नागरिक, शांतता समितीचे सदस्य, प्रतिष्ठित नागरिक, गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच राजारामपुरी पोलीस ठाण्याकडील अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

या बैठकीला परिसरातील सुमारे १०० ते १२५ नागरिकांची उपस्थिती होती. विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून गणेशोत्सव निर्विघ्नपणे पार पाडण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

गणेशोत्सव उत्साहात, पण नियमांच्या चौकटीत.!

गणेशोत्सव हा सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा उत्सव आहे. त्यामुळे उत्सव साजरा करताना नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन राजारामपुरी पोलिसांकडून करण्यात आले. पोलिसांच्या या बैठकीमुळे गणेश मंडळे आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मज़बूत होण्यास मदत होणार असून, शांतता, शिस्त आणि सुरक्षिततेत गणेशोत्सव पार पाडण्यासाठी राजारामपुरी पोलीस सज्ज असल्याचे चित्र आहे.

# ग्रामीण युवतींच्या स्वसंरक्षणासाठी जयभवानी महाविद्यालयाचा पुढाकार

## अंतर्गत तक्रार निवारण समितीतर्फे तीन महिन्यांचे 'कराटे प्रशिक्षण शिबिर'

पाटोदा प्रतिनिधी

ज.भ.शि.प्र. मंडळाच्या कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथील अंतर्गत तक्रार निवारण समितीतर्फे विद्यार्थिनींसाठी 'राजमाता जिजाऊ युवती स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. दि. १ ऑगस्ट ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत हे प्रशिक्षण सुरू आहे.



शिबिराचे उद्घाटन श्री. शिवाजीराव पंडित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढीचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे होते. प्रमुख पाहुणे व कराटे प्रशिक्षक कंकरसिंग टाक, सहाय्यक प्रशिक्षक कु. मयुरी धनंजय जाधव, तसेच प्रा. सोमनाथ घाडगे व प्रा. विनोद किर्दक उपस्थित होते.

अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या पीठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे यांनी प्रास्ताविकातून प्रशिक्षणाचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थिनींमध्ये आत्मसंरक्षणाची भावना, शारीरिक तंदुरुस्ती, आत्मविश्वास आणि संकटांचा सामना करण्याचे कौशल्य विकसित करणे हा शिबिराचा उद्देश आहे.

डॉ. विश्वास कदम यांनी विद्यार्थिनींसाठी आत्मसंरक्षण प्रशिक्षण आवश्यक असल्याचे सांगितले. कंकरसिंग टाक यांनी कराटेच्या विविध तंत्रांचे प्रात्यक्षिक करून आत्मसंरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सदाशिव सरकटे यांनी विद्यार्थिनींनी प्रशिक्षणाचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अशोक देवगुडे यांनी केले, तर प्रा. डॉ. वंदन जाधव यांनी आभार मानले. आयोजनासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम..

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसोबतच त्यांचा आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता व सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास साधणारा हा उपक्रम कौतुकास पात्र ठरत असून, महाविद्यालयाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# बीड जिल्हा रुग्णालयात ऑक्सिजन ह्युमिडिफायरमधील गढूळ पाण्याचा प्रकार; रुग्णांच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

पालकमंत्री सुनेत्रा पवार, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे तक्रार; डॉ. गणेश ढवळे यांची चौकशीची मागणी

बीड, दि. २५ : बीड जिल्हा रुग्णालयातील रुग्णांच्या उपचाराबाबतच्या तक्रारी पुन्हा चर्चेत आल्या आहेत. सेमी आयसीयू कक्षातील एका रुग्णाला सोनोग्राफीसाठी नेत असताना श्वास घेण्यास त्रास झाल्याने ऑक्सिजन देण्यात आला. यावेळी ऑक्सिजन पुरवठ्यासाठी वापरण्यात आलेल्या ह्युमिडिफायरमधील पाणी गढूळ असल्याचे निदर्शनास आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

प्रकार निदर्शनास आल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांनी ह्युमिडिफायरमधील पाणी काढून नवीन ह्युमिडिफायर बसवून ऑक्सिजन पुरवठा सुरू केल्याची माहिती आहे. ह्युमिडिफायरमधील पाणी दूषित असल्यास गंभीर रुग्णांना संसर्गाचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता, ह्युमिडिफायरची स्वच्छता व निर्जंतुकीकरणाची प्रक्रिया तपासणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी वडवणी येथील संध्या सूरज पवार यांच्या प्रसूतीदरम्यान वैद्यकीय साहित्य शरीरात राहिल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानंतर संसर्ग झाल्याने आतडे व गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया करावी लागल्याचा आरोप असून, या पार्श्वभूमीवर जिल्हा रुग्णालयाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

रुग्णांच्या जीवाशी खेळ सुरू आहे काय? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड



जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला. ह्युमिडिफायरमधील पाण्याचा नमुना उपलब्ध असल्यास त्याची प्रयोगशाळेत तपासणी करावी, तसेच ऑक्सिजन यंत्रणा, स्वच्छता व निर्जंतुकीकरण प्रक्रियेची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली.

याबाबत पालकमंत्री सुनेत्रा पवार आणि आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे लेखी तक्रार करण्यात आली असून, रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीने चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



# रेडेकरवस्ती, मुळेवस्ती व पारधीवस्तीवर तीव्र पाणीटंचाई

टँकर सुरू करण्याची आ.सुरेश धस यांच्याकडे मागणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी परिसरात पावसाच्या कमतरतेमुळे पाणीटंचाईची समस्या गंभीर बनली असून, रेडेकरवस्ती, मुळेवस्ती आणि पारधीवस्ती परिसरातील नागरिकांना गेल्या महिनाभरापासून पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या भागातील नागरिकांची पाण्यासाठी होणारी भटकंती तातडीने थांबविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार आ. सुरेश आण्णा धस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

रेडेकरवस्ती येथील नागरिक विष्णू सदाशिव रेडेकर यांनी आ. सुरेश धस यांना हे निवेदन दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की, परिसरात पुरेसा पाऊस न झाल्याने पाणीपातळी खालावली आहे. परिणामी रेडेकरवस्ती, मुळेवस्ती आणि पारधीवस्ती या भागात गेल्या महिनाभरापासून पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. नागरिकांना दैनंदिन गरजांसाठीही दूरवरून पाणी आणावे लागत असून, पाण्यासाठी मोठी वणवण करावी लागत आहे.

## माजी आ.भीमराव धोंडे यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

# उजनीचे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणा

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) कृष्णा खोरे अंतर्गत उजनी धरणातून आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलावात पाणी आणण्याची प्रलंबित योजना तातडीने मार्गी लावून तिच्या कामांना जलद गती द्यावी, अशी आग्रही मागणी आष्टी-पाटोदा-शिरूर (का.) विधानसभा मतदारसंघाचे माजी आ. भीमराव आनंदराव धोंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात माजी आ. धोंडे यांनी २५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविले आहे.

आष्टी तालुका हा कायमस्वरूपी दुष्काळी व पाणीटंचाईग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. तालुक्यात पावसाचे प्रमाण अनिश्चित असल्याने शेतीचे नियोजन सातत्याने अडचणीत येते. त्याचबरोबर उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनतो.

पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता हा देखील मोठा प्रश्न असून, या सर्व समस्यांमुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांना दरवर्षी पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे आष्टी तालुक्याच्या पाणीप्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी उजनी धरणाचे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणणे अत्यंत आवश्यक असल्याचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे.

उजनी धरणातून खुंटेफळ साठवण तलावापर्यंत पाणी आणण्यासाठी आवश्यक असलेली उपसा सिंचन योजना, पाइपलाइन, जलवाहिनी तसेच अन्य संबंधित कामे प्रलंबित आहेत. या कामांना तातडीने गती देऊन योजना पूर्णत्वास नेण्यासाठी शासनाने विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी धोंडे यांनी केली आहे. हा प्रकल्प आष्टी तालुक्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि विशेष प्राधान्याचा प्रकल्प म्हणून हाताळावा.



प्रलंबित कामांसाठी आवश्यकतेनुसार वाढीव निधी उपलब्ध करून देऊन कामे कोणत्याही कारणाने रखडणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.

योजनेच्या कामांची प्रगती नियमितपणे तपासण्यासाठी संबंधित विभागांची बैठक घेऊन त्याचा आढावा घ्यावा तसेच प्रत्येक कामासाठी कालबद्ध नियोजन निश्चित करून संबंधित यंत्रणांना काम पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश द्यावेत, अशी मागणीही माजी आ. धोंडे यांनी केली आहे. केवळ निधी उपलब्ध करून न थांबता प्रत्यक्ष कामाला गती देऊन ही योजना निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले आहे.

खुंटेफळ साठवण तलावात उजनीचे पाणी उपलब्ध झाल्यास आष्टी तालुक्याच्या विकासाला मोठी चालना मिळू शकते. सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता वाढल्याने शेती अधिक स्थिर होण्यास मदत होईल. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात कायमस्वरूपी सुटण्यास मदत होईल. तसेच पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता वाढल्याने ग्रामीण भागातील पशुपालकांनाही मोठा दिलासा मिळेल. पाण्याच्या उपलब्धतेमुळे शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्याची शक्यता आहे.

आष्टी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्याच्या दृष्टीने उजनीचे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणण्याच्या मागणीची राज्य शासनाने गांभीर्याने आणि तातडीने दखल घ्यावी. संबंधित विभागांना आवश्यक प्रशासकीय व आर्थिक निर्देश देऊन प्रलंबित कामे मार्गी लावावीत, अशी विनंती माजी आ. भीमराव आनंदराव धोंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

या पत्राच्या प्रती जलसंपदा विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जिल्हाधिकारी बीड तसेच महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांना देण्यात आल्या आहेत.

आष्टी तालुक्यातील पाणीप्रश्नाच्या पार्श्वभूमीवर माजी आ. भीमराव धोंडे यांनी पुन्हा एकदा उजनीचे पाणी खुंटेफळ साठवण तलावात आणण्याचा मुद्दा शासनाच्या स्तरावर मांडल्याने या प्रलंबित योजनेला आता प्रत्यक्ष गती मिळणार का, याकडे आष्टी तालुक्यातील शेतकरी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# ज्या मातीत घडले महाराष्ट्र केसरी, त्याच मातीत पृथ्वीची पहिली पावले

## आजोबा भीमराव धोंडेंच्या तालमीतून नातवाला कुस्तीचे धडे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टीच्या मातीत कुस्तीचा समृद्ध वारसा रुजला असून या परंपरेला अनेक दिग्गज पैलवानांनी आपल्या कर्तृत्वाने नवी उंची मिळवून दिली आहे. याच कुस्ती परंपरेशी माजी आमदार तथा पैलवान भीमराव धोंडे यांचे घट्ट नाते आहे. स्वतः पैलवान असलेल्या भीमराव धोंडे यांनी कुस्तीची आवड जपत अनेक पैलवानांना प्रोत्साहन देण्याबरोबरच आष्टीच्या कुस्ती क्षेत्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले. आता याच परंपरेची नवी सुरुवात त्यांच्या दोन वर्षांच्या नातवाच्या रूपाने झाली असून पृथ्वी अभय धोंडे याने बाबाजी तालमीच्या मातीत कुस्तीची पहिली पावले टाकली आहेत.



आखाड्यातील माती, अंगाला लागणारा घाम, पहाटेचा व्यायाम आणि कुस्तीची शिस्त यांचा संस्कार आष्टीच्या बाबाजी तालमीने गेल्या पंधरा वर्षांपासून जपला आहे. या तालमीतून हजारो पैलवानांनी कुस्तीचे प्रशिक्षण घेतले असून अनेकांनी विविध स्तरांवर आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविली आहे. याच तालमीच्या मातीत महाराष्ट्र केसरीचा बहुमान मिळविणारे सईद चाऊस यांच्यासारखे नामवंत पैलवान घडले. त्यामुळे बाबाजी तालमीने आष्टीच्या कुस्तीचा लौकिक दूरवर पोहोचविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

कुस्तीची हीच परंपरा आता धोंडे कुटुंबातील तिसऱ्या पिढीकडे जाताना दिसत आहे.

माजी आमदार तथा पैलवान भीमराव धोंडे आपल्या नातवाला, पृथ्वी अभय धोंडे याला आखाड्याची ओळख करून देत असून त्याला कुस्तीतील प्राथमिक हालचाली, व्यायामाची शिस्त आणि आखाड्यातील संस्कार समजावून सांगत आहेत. दोन वर्षांच्या चिमुकल्या पृथ्वीला आजोबांच्या हातून कुस्तीचे धडे मिळत असल्याचे दृश्य बाबाजी तालमीत पाहायला मिळत आहे.

आजोबा पैलवान, वडील कुस्ती परंपरेचे वारसदार आणि आता नातू आखाड्यात

धोंडे कुटुंबात पैलवानकीची आवड पिढ्यान्पिढ्या जपली जात आहे. भीमराव धोंडे स्वतः पैलवान असल्याने त्यांच्या आयुष्यात कुस्तीला केवळ खेळाचे स्थान नसून ती एक जीवनशैली आणि संस्काराचा भाग राहिला आहे. त्याच संस्काराची पुढील पिढीत रुजवणूक करण्याचा प्रयत्न आता पृथ्वीच्या माध्यमातून सुरू झाला आहे.

पृथ्वी अभय धोंडे हा अवघ्या दोन वर्षांचा असला तरी बाबाजी तालमीच्या मातीत त्याची झालेली ही पहिली ओळख आष्टीच्या कुस्तीप्रेमींसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. आजोबांच्या मार्गदर्शनाखाली आखाड्यातील वातावरण अनुभवताना या चिमुकल्याच्या रूपाने धोंडे कुटुंबातील पैलवानकीचा वारसा पुढे जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

आष्टीची ओळख कुस्तीची परंपरा, मातीत घडलेले पैलवान आणि आखाड्यातील संस्कार यासाठी आहे. या परंपरेला सईद चाऊस यांच्यासारख्या महाराष्ट्र केसरी पैलवानांनी मोठा लौकिक मिळवून दिला. बाबाजी तालमीने गेल्या पंधरा वर्षांत हजारो पैलवान घडवून या परंपरेला बळ दिले. आता त्याच मातीत पृथ्वी अभय धोंडे याने टाकलेली पहिली पावले ही आष्टीच्या आखाड्याला लाभलेली नव्या पिढीची चाहूल मानली जात आहे.

कुस्तीमध्ये यश मिळविण्यासाठी ताकदीसोबतच सातत्य, शिस्त, संयम आणि कठोर मेहनत आवश्यक असते. या सर्वांचा पहिला संस्कार पृथ्वीला आपल्या आजोबांकडून मिळत आहे. त्यामुळे भविष्यात पृथ्वी किती मोठी मजल मारतो, हे काळच ठरवेल; मात्र ज्या मातीत महाराष्ट्र केसरी घडले, त्याच मातीत पृथ्वीची पडलेली ही पहिली पावले आष्टीच्या कुस्ती परंपरेच्या पुढील अध्यायाची नांदी ठरत आहेत.

# आयपीएस अधिकारी चिन्मय पंडित यांची ऑस्ट्रेलियात 'फर्स्ट सेक्रेटरी' पदी नियुक्ती



पंडित दांपत्याचा राज्यस्तरीय आदर्श माता-पिता पुरस्काराने गौरव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अधिकारी चिन्मय सुरेश पंडित यांची भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या वतीने ऑस्ट्रेलियात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी 'फर्स्ट सेक्रेटरी' या महत्त्वपूर्ण पदावर तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याने आष्टीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, चिन्मय पंडित यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

चिन्मय पंडित यांनी भारतीय पोलीस सेवेत कार्यरत असताना आपल्या कार्यक्षमतेची व कर्तृत्वाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता भारत सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या माध्यमातून ऑस्ट्रेलियात 'फर्स्ट सेक्रेटरी' म्हणून काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. तीन वर्षांच्या या नियुक्तीदरम्यान ते ऑस्ट्रेलियात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांच्या या आंतरराष्ट्रीय नियुक्तीमुळे आष्टी तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या नावलौकिकात भर पडली आहे.

दरम्यान, चिन्मय पंडित यांचे वडील सेवानिवृत्त कृषी अधिकारी सुरेश पंडित आणि आई सौ. मंजिरी सुरेश पंडित यांना त्यांच्या संस्कारक्षम पालकत्वाचा गौरव म्हणून नुकताच 'गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श माता-पिता पुरस्कार' जाहीर करण्यात आला होता. मात्र पुरस्कार वितरण सोहळ्याच्या वेळी पंडित दांपत्य परदेशात असल्यामुळे त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नव्हते.

भारतात परतल्यानंतर आष्टी येथे आयोजित छोटेखानी समारंभात भगवान महाविद्यालय, आष्टीचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. आबासाहेब पोकळे यांच्या हस्ते सुरेश पंडित व सौ. मंजिरी सुरेश पंडित यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन पंडित दांपत्याचा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला.

या वेळी ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्रा. बाळासाहेब नालकोल आणि अनंता धोंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी पंडित दांपत्याचे अभिनंदन करून, मुलाच्या यशामागे पालकांचे संस्कार, शिस्त, शिक्षणाविषयीची सकारात्मक भूमिका आणि कुटुंबीयांचे मार्गदर्शन यांचे मोठे योगदान असल्याचे नमूद केले.

सुपुत्राची आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण नियुक्ती आणि पालकांचा राज्यस्तरीय गौरव असा दुहेरी सन्मान पंडित कुटुंबाला मिळाल्याने आष्टी परिसरात आनंदाचे वातावरण आहे. चिन्मय पंडित यांच्या आंतरराष्ट्रीय नियुक्तीबद्दल तसेच सुरेश पंडित व सौ. मंजिरी पंडित यांना मिळालेल्या 'गंगाई-बाबाजी राज्यस्तरीय आदर्श माता-पिता पुरस्काराबद्दल' पंडित कुटुंबावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.